अस्तरावरील पाषाण चित्रात राजा शुद्धोदनाच्या दरबारातील दृश्य आहे. त्यात तीन ज्योतिषी बुद्धाची आई, मायाला स्वप्नाचा अर्थ समजावून सांगत आहेत. इ.स. दुसऱ्या शतकातील नागार्जुन-कोंडा येथील एका शिलात कोरलेल्या या प्रसंगात खालच्या बाजूला बसलेला राजचिटणवीस स्वप्नाचा अर्थ लिहून घेत आहे. भारतीय लेखन कलेच्या शिल्पबद्ध पुरावा देणारे हे अत्यंत पुरातन शिल्प असावे, असा अंदाज आहे.

राष्ट्रीय संग्रहालय, नवी दिल्ली, यांच्या सौजन्याने -

साहित्य अकादेमी पुरस्कृत ओडीया नाटक

अरण्य-पीक

लेखक
मनोरंजन दास

अनुवादक
राधा जोगळेकर
वासुदेव जोगळेकर

साहित्य अकादेमी

Aranya Peek (अरण्य-पीक) :
Marathi translation by Radha Joglekar & Vasudev Joglekar of Manoranjan Das's Akademi Award Winning Drama `Aranya Fasal' in Oriya
Sahitya Akademi, New Delhi (1999), Rs. Sixty five only

First Edition : 1999

Published by :
Sahitya Akademi

Head office :
Rabindra Bhavan, 35, Ferozeshah Road, New Delhi 110 001.

Sales office :
Basement in `Swati', Mandir Marg, New Delhi 110 001

Regional Offices :
172, M.M.G.S. Marg, Dadar (East), Mumbai 400 014
Jeevan Tara, 23A/44X, Diamond Harbour Road, Calcutta 700 053
Guna, 304-305, Anna Salai, Teynampet, Chennai 600 018
ADA Rangamandira, 109, J. C. Road, Bangalore 560 002.

ISBN 81-260-0450-9

मूल्य 65 रुपये

Printed by
New Age Printing Press
Bhupesh Gupta Bhavan, 85 Sayani Road,
Prabhadevi, Mumbai 400 025.

अंक पहिला

(चारीबाजूंनी डोंगरांनी वेढलेल्या जंगलाच्या मध्यभागी एक डाकबंगला. डाकबंगल्यात मध्यभागी असलेली ही खोली, ही बैठकीची खोली. इथे ५/६ खुर्च्या. मध्ये एक मोठे टेबल. अपस्टेजच्या एका कोपऱ्यात लाकडाचा एक मोठा पेटारा. वेगवेगळ्या वन्य प्राण्यांच्या विचित्र पद्धतीने रंगवलेल्या चित्रांनी चिताडलेल्या भिंती. जसे - दोन मोठ्या रानरेड्यांची टक्कर, हरिणाच्या मागे लागलेला वाघ. एका झऱ्याजवळ अनेक वन्य प्राणी जवळ जवळ बसले आहेत. म्हणजे वाघ, गवा, हरिण, कोल्हा वगैरे. बैठकीच्या खोलीसमोर अपस्टेजला मध्यभागी डाकबंगल्याचे प्रवेशद्वार. त्या दाराबाहेर एक मोठा व्हरांडा दिसतो. ह्याच खोलीच्या दोन्ही बाजूला आणखी दोन खोल्या, ज्यांची दारे ह्याच खोलीत उघडतात. समोरच्या दरवाज्याच्या दोन्ही बाजूंना गज असलेल्या दोन खिडक्या. दार व खिडकीतून बाहेरचा व्हरांडा, जंगल व डोंगराचा भाग स्पष्ट दिसत आहे. दुपारची वेळ. बाहेरून दरवाजा उघडून सुब्रत आत येतो. हातात एक छोटी सुटकेस. सुब्रत तरूण आहे. चिंतनशील. मोजुनमापून बोलणारा. पाठोपाठ त्याची बायको बेबी आत येते. किडकिडीत. अशक्त. बोलता बोलता एकाएकी गप्प बसणारी. सुब्रत आत येऊन टेबलावर सुटकेस ठेवतो. दोन्ही खिडक्या उघडतो व हाक मारतो.)

सुब्रत : चौकीदार .... चौकीदार

(मागे वळून बघतो तर बेबी आहे तिथेच उभी आहे. हातात सुटकेसही तशीच आहे. तिच्या हातातून सुटकेस काढून घेता घेता...)

- काय झालं?

बेबी : अं...

सुब्रत : काय झालं?

बेबी : काही नाही.

सुब्रत : खरंच काही झालंय का?

बेबी : काही नाही.

सुब्रत : बस न खाली.

बेबी : (लक्ष नसल्यासारखी बसते) अं... हो...

सुब्रत : सुटकेस उघडायलाही सांगावं लागणार का?
बेबी : कपडे काढून देऊ?
सुब्रत : फक्त माझेच?
बेबी : माझेही?
सुब्रत : कपडे बदलणार नाहीस?
बेबी : मळल्यासारखे वाटतात का?
सुब्रत : रस्त्यावरच्या धुळीमुळे. . .
(मग टेबलाजवळ जाऊन सुटकेस उघडून कपडे काढायला लागते.)
सुब्रत : बेबी जरा रिलॅक्स, आपल्याला इथे तीन दिवस रहावयाचे आहे.
बेबी : इथे?
सुब्रत : (तिच्या हातातून कपडे घेत) मग आपण इथे आलोत कशाला?
बेबी : पण इथे?
सुब्रत : हो इथेच राहू या. मजा करू या.
बेबी : तुम्ही काय मला इथे मजा करायला आणलं आहेत?
सुब्रत : मग कशासाठी आलोत म्हणून वाटलं?
बेबी : नाही
(ती उठून बाहेर बघते जणू काही सगळं प्रथमच बघत आहे.)
तुम्हाला माहित होत इथे येण्यासाठी मी नकार दिला असता.
सुब्रत : नकार, का?
बेबी : मग येण्याअगोदर सांगितलं नाहीत.
सुब्रत : तूला सरप्राईज देणार होतो.
बेबी : ह्या डोंगराना नको असेल तर. . .
सुब्रत : का? किती सुंदर परिसर . . . चारी बाजूला डोंगर. . . जंगल. . . एकांत.
बेबी : नको, इथे नाही रहायचं आपण.
सुब्रत : बेबी!
बेबी : गाडी आहेच, कुठेंतरी दुसरीकडे जावू या
सुब्रत : पण इथे . . .
बेबी : पण मला हे समजत नाही इथे असे आकर्षण वाटण्यासारखे काय

आहे?

(असं म्हणत बेबी खिडकीजवळ जाऊन बाहेर बघते.)

सुब्रत : तू आधीही कधी इथे आली होतीस का?

बेबी : चौकीदार . . .

सुब्रत : कुठे आहे?

बेबी : (जोराने हाक मारते) चौकीदार...

सुब्रत : (बेबीजवळ जाऊन खिडकीतून बाहेर बघत) चौकीदार.

(बेबी टेबलाजवळ येऊन सुटकेसमधून काढलेले कपडे घड्या करून परत ठेवत असते. सुब्रत खिडकीपासून बाजूला होतो)

तो येतोय.

बेबी : कुठे आहे? (कपडे घड्या करून आत ठेवता ठेवता सुटकेसच्या आत हात फिरवते)

सुब्रत : (जोराने हसत) मी म्हणतो, रूटीन लाईफमधून एकदम मुक्त होऊ.

बेबी : मग काय चोवीस तास माझ्याकडे पहात बसणार आहात?

सुब्रत : म्हणून तर मी एकही पुस्तक आणलं नाही.

बेबी : अरेरे! पुस्तकांना खूप दु:ख होत असेल.

सुब्रत : च...च... रडत असतील.

बेबी : खरंच बिचारी पुस्तकं.

सुब्रत : इथेही इर्षा, मत्सर?

बेबी : पुस्तकांची नव्हे.

सुब्रत : मग काय माझा?

बेबी : हो...

सुब्रत : तुला तर मी पुस्तक घेऊन दिवसरात्र बसायला नाही म्हणत नाहीए.

बेबी : मी काय कुठली प्रोफेसर का?

सुब्रत : एक विसरलीस.

बेबी : युनिव्हर्सिटीची...

सुब्रत : तत्त्वज्ञानाची.

बेबी : तत्त्वज्ञानाचा प्रोफेसर काय मजा करत बसतो?

सुब्रत : (हसत हसत) मग काय फक्त पुस्तक समोर घेऊन बसतो?

बेबी : (हेटाळणीच्या सूरात) नाही तर...!

सुब्रत : म्हणून तर .... इथे ...

बेबी : फारच सुंदर कल्पना...

सुब्रत : तीन दिवस सुट्टी....

बेबी : इथे मजा करायला...

सुब्रत : सगळं विसरून...

बेबी : सगळं...?

सुब्रत : सगळं.

बेबी : तुम्ही पुस्तके घेऊन बसणार नाही नं?

सुब्रत : नो!

बेबी : मी काय करू?

सुब्रत : गाणी म्हण.

बेबी : नाचू नको का?

सुब्रत : कॉलेजमध्ये तू नाच करत होतीस का?

बेबी : नाटकात काम करायची.

सुब्रत : मला कधीही नाटकात काम करणं जमलं नाही.

बेबी : ओ हो...

सुब्रत : पण नाटक बघतो.

बेबी : आवडतात?

सुब्रत : चांगली असली तर आवडतात.

बेबी : ओ...

सुब्रत : सकाळी उठून फिरायला जाऊ.

बेबी : जवळ असलेल्या झऱ्याजवळ.

सुब्रत : झरा? (आश्चर्याने बघत) तुला काय माहीत?

बेबी : (हसत) असंच वाटलं - असेल.

सुब्रत : (हे बोलत असताना सुब्रत खिडकीजवळ जाऊन बाहेर डोकावतो) तो येतोय.

बेबी : चौकीदार?

(सुब्रत संमत्तीदर्शक मान हलवतो. चौकीदार येतो. बरंच वय झालेला. त्याच्या बोलण्यातून वाटतं दुसऱ्याची सेवा करण्यातच दिवस गेले. चौकीदार येऊन नमस्कार करतो व लगबगीने एका कडेला ठेवलेल्या पेटाऱ्यातून पडदे काढून खिडक्यांना लावायला सुरूवात करतो)

सुब्रत : चौकीदार...

चौकीदार : (पडदे लावता लावता) यायला थोडा उशीर झाला साहेब. सध्या इथे विशेष कोणी येतही नाहीत. दोन तीन कोंबड्या ठेवल्या होत्या. कोणी कधी आले तर एखाददुसरं अंड खपत असे. ... पण जंगलात कोल्हे खूप आहेत. सगळ्या कोंबड्या साफ केल्या. (अतिशय केविलवाणी) किती दिवस एकटा रहणार, म्हणून साहेब आता एक शेळी पाळलीय.

सुब्रत : शेळी?

चौकीदार : स्वयंपाकघराबाहेरच्या व्हरांड्यात तिला बांधतो साहेब. जर मोकळी सोडली तर रानात पळून जाईल. ती रानावनात काट्याकुट्यातून धावत उड्या मारीत जाईल. मी साहेब, म्हातारा माणूस. किती तिचा पाठलाग करू? तिच्यामागे किती धावू?

सुब्रत : (विनोदाने विचारतो) मग तू तिला परत आणलीस का रानातच सोडून आलास?

चौकीदार : परत घेऊन आलो साहेब.

बेबी : (अचानक) शेळी एक पाळीव प्राणी आहे.

चौकीदार : (काम जरा थांबवून) जी बाईसाहेब.

बेबी : कोंबडी पाळीव पक्षी आहे.

चौकीदार : (विस्मयाने) जी बाईसाहेब.

बेबी : गाय एक...

चौकीदार : (काही न समजून) .... जी?

सुब्रत : हे बघ, शहरात जास्त शेळ्या बघायला मिळत नाहीत म्हणून...

चौकीदार : हो. हो. होय साहेब.

सुब्रत : मग तू केव्हा शेळीचा पाठलाग सुरू करणार?

चौकीदार : नाही साहेब... इथे आता आणखी काही कामं राहिली नाहीत. बाथरूममध्ये सगळ्या बादल्या भरून ठेवल्या आहेत. गाव इथून जवळच आहे. एक फर्लांगावर. तिथं एक छोटं दुकान आहे. एक छोटीशी शाळाही आहे.

रात्रीकरता लागणारं खाण्यापिण्याचं सगळं सामान मी आणून ठेवलं आहे.

सुब्रत : छान! छान!...

चौकीदार : ह्या डाकबंगल्यामध्ये दोन बेडरूम्स आहेत. ह्या बाजूला एक व त्या बाजूला एक. दोन्ही खोल्या साहेब आपल्याच आहेत. जी पसंत असेल - बाईसाहेब आपण स्वत:च बघा.

(चौकीदार हे सांगत असताना दोन्ही बाजूचे दरवाजे उघडतो. मग उजव्या खोलीकडे बोट दाखवत..)

ह्या खोलीकडे जायचा हा रस्ता. (मग डाव्या बाजूच्या दाराकडे येत) ह्या खोलीकडे जायचा हा रस्ता. पण ह्या खोलीच्या खिडकीला गज नाहीत. ह्या बाजूनी उडी मारून कोणी केव्हाही स्वयंपाकघराकडे....

सुब्रत : ठीक आहे, ठीक आहे. तू जा.

बेबी : मी खोली बघून येते. (निघाली होती... पण परत टेबलाजवळ बसते.) नाही बघितली तर...

सुब्रत : ते येत असतील नं!

बेबी : ते?

सुब्रत : (गंमतीने) सांग पाहू ते कोण असतील?

बेबी : कोण?

सुब्रत : (तिला काहीच न सांगता) चौकीदार...

बेबी : (उठून सुब्रतजवळ जाते) कोण?

सुब्रत : तू कुठे सांगू शकलीस?

बेबी : पण कोण?

सुब्रत : तुला अंदाजही करता आला नाही.

बेबी : ऊं हूं...

सुब्रत : (तिची उत्कंठा वाढविण्यासाठी हसत हसत) थोडी वाटसुद्धा बघू शकत नाहीस?

बेबी : पण कोण?

सुब्रत : माठ भरून ठेवला आहे ना चौकीदार?

चौकीदार : हां जी!

सुब्रत : दोन्ही खोल्यात...

चौकीदार : (उजव्या खोलीत शिरता शिरता) जी... पिण्याचं पाणी माठात व वापरायचं बादलीत.

सुब्रत : (सगळं नीट आहे का नाही बघण्यासाठी चौकीदाराच्या मागोमाग उजव्या खोलीत जातो)

हूं ...

बेबी : (पहात) ओहो...

(वर्मा आत येतात)

वर्मा : ओ हो (वर्मा प्रौढ, अजब पोशाख घातलेला आहे. एका खांद्यावर कॅमेरा व दुसऱ्या खांद्यावर बंदूक. हातात खूप पॅकेट्स आहेत.)

बेबी : (एकदम उठून) ओ...

वर्मा : हॅलो बेबी! विशेष काही अडचण आली नाही नं!

बेबी : (भानावर येत) आँ...

वर्मा : आय बेट. काही प्राब्लेम आला नसेल.

बेबी : नाही. काही नाही.

वर्मा : (पॅकेट्स बेबीच्या हातात देत असताना व बेबी ती पॅकेट्स टेबलावर ठेवत असताना) चहा!

बेबी : (पाकिट बघत) लीफ टी ...

वर्मा : कॉफी.

बेबी : रोस्टेड

वर्मा : मील्क

बेबी : कन्डेन्स्ड

वर्मा : स्नॅक्स

बेबी : (पाकिट फोडून बघते) साल्टेड बिस्किट्स. काजू-चिवडा. (ठेवते)

वर्मा : शेव. चनाचूर (पाकीट उघडून बघतो. दिसल्यावर) ओह. गुड.

बेबी : (पाकीट घेत) गुड...

वर्मा : कॅमेरा (कॅमेरा काढून ठेवतो)

बेबी : बंदूक - (बंदूक त्याच्या खांद्यावरून काढून घेते व बाहेरच्या बाजूला बंदुकीतून बघत असताना) लोडेड...?

वर्मा : (हसत हसत) नाही!

बेबी : गोळ्या?

वर्मा : (लक्षात आल्याबरोबर खिसे चाचपून बघतो. जरा गडबडतो. खिडकीजवळ जातो.) लिली माझ्या सीटवर गोळ्यांचं पाकिट राहिलं आहे!

सुव्रत : (त्याचवेळेस बैठकीत येत) मागच्या सीटवर? (मग वाट न बघता बाहेर जातो. मागोमाग चौकीदार. बेबी टेबलाजवळ येत बंदूक ठेवत)

वर्मा : पॉवरफूल बंदूक आहे. ह्याच बंदूकीनी एकदा वाघ मारला होता.

बेबी : इथे वाघ आहेत?

वर्मा : लक बघू या!

बेबी : हरीण असेल.

वर्मा : वाटतं.

बेबी : शेळी आहे.

वर्मा : शेळी...

बेबी : काटेरी निवडुंग खाणारी शेळी...

(वर्मा आश्चर्याने बघतो... बेबी हसत हसत सांगत असते. शेळी एक पाळीव प्राणी. शेळी... शेळी म्हणत ती जोरात हसते. वर्मा काहीही न समजूनही जोरात हसायला लागतो. आत लीली वर्मा येते. वय पस्तीशीच्या आसपास. शरीराने स्थूल. आधुनिक वेषभूषा, साडी व ब्लाऊजमध्ये पोटाच्या व पाठीच्या वळ्या ओथंबत आहेत. लिली व सुव्रत एक फळाची करंडी दोन्ही बाजूंनी धरून झुलवत झुलवत आणत आहे. त्यावर बंदुकीच्या गोळ्यांचा बॉक्स ठेवला आहे. चौकीदार डोक्यावर दोन सुटकेस ठेऊन आणत आहे. सगळे आत येऊन सर्व जिनसा मधल्या टेबलावर ठेवतात.)

लिली : हॅलो बेबी!

बेबी : हॅलो! (त्या दोघी एकमेकींना हॅलो करत असताना चौकीदार बाहेर जातो)

वर्मा : ओ. के. सुव्रत.

सुव्रत : ओ. के.

वर्मा : लीली... मी म्हणालो नव्हतो ही मंडळी आधी पोचली असतील. म्हणून इथे अगोदर निरोप पाठवून सगळी व्यवस्था...

लिली : किती आधी... केव्हा?

बेबी : आत्ताच.

लिली : मग ठीक आहे.

सुव्रत : बेबीला बर वाटत नाहीये.

बेबी : नाही नाही.

लिली : (बेबीचं समर्थन करीत) नाही.

सुब्रत : इथे येऊन बेबी खूश नाही आहे.

लिली : बेबी!

वर्मा : बेबी!

बेबी : मी ठीक आहे.

लिली : सुंदर जागा...

सुब्रत : चारीबाजुला डोंगर...

बेबी : (फळाच्या करंडीत बघत) सगळीकडे जंगल...

लिली : वाघसुद्धा असतील.

वर्मा : तू बंदूक आणायला नको म्हणत होतीस.
(सुब्रत बेबीला मदत करायची म्हणून फळाची करंडी उचलायला जातो)

बेबी : मी उचलू शकेन. (करंडी कशीबशी उचलते)

वर्मा : लिली...

लिली : हो... (लिली उठून बेबीला मदत करते. दोघी करंडी घेऊन उजव्या घरात जातात)

वर्मा : बेबीला बरं नाही?

सुब्रत : काही नाही.

वर्मा : म्हणालात...

सुब्रत : नाही.

वर्मा : बोलला नाहीत?

सुब्रत : (चिडतो)

वर्मा : का? (लिली येते)

लिली : सुब्रत तुम्ही बेबीजवळ बोलला नव्हतात?

सुब्रत : काय?

लिली : इथे येण्याबद्दल.

वर्मा : सुब्रत?

सुब्रत : नव्हतो बोललो.

लिली : का?

(सुब्रत काही न बोलता मुर्खासारखं हसत टेबलावरची एक सुटकेस उचलून लिलीच्या हातात देतो)

वर्मा : इथे आपण येणार आहोत...

सुब्रत : त्याबद्दलही नाही.

लिली : हे मात्र बरोबर नाही. (सुटकेस घेऊन लिली आत जाते)

सुब्रत : तुम्हालाही असंच वाटतं?

वर्मा : (काहीतरी विचार करीत) अं... हो...

सुब्रत : ऐकलंत का?

वर्मा : (काहीवेळ गप्प बसून मग आठवल्यासारखं) हो!

सुब्रत : काय?

वर्मा : विचार करतो आहे.

सुब्रत : Really Sad.

वर्मा : (सहज स्वरात) होऊ शकतं.

सुब्रत : वाटत नाही.

वर्मा : खरं?

सुब्रत : काही वेळाने सगळं ठीक होईल...

वर्मा : ओ...

लिली : (आत येते) पण...

वर्मा : काय?

लिली : पण बेबी?

सुब्रत : सवयच आहे.

लिली : तसं नाही...

वर्मा : दुसरं काही असेल असं वाटतं?

लिली : (सुब्रतला) दुसरं काही आहे का?

सुब्रत : नो. दुसरं तिसरं काही नाही.

लिली : आश्चर्य.

सुब्रत : सांगतोयनं... थोड्या वेळाने सगळं काही ठिक होईल.

वर्मा : (लिलीला) स्वभाव बदलणं अशक्य!

लिली : हे तुम्ही मला सांगताय!

वर्मा : तुझा तरी स्वभाव?

सुब्रत : असला तरी बिघडतं कुठे?

वर्मा : हो बिघडणार काय?

लिली : तुमचा जो काही स्वभाव आहे -

(बेबी आत येते. सगळ्यांकडे आश्चर्याने बघते)

बेबी : ठीक आहे.

वर्मा : काय?

बेबी : इथे रहायचं ठरलंच आहे तर ह्या सगळ्या जिनसा (टेबलावरच्या जिनसा उचलायला लागते)

सुब्रत : मी काय म्हणत होतो...

बेबी : काय?

सुब्रत : थोड्या वेळाने तुला बरं वाटेलं.

बेबी : मी बरी आहे.

सुब्रत : हूं...

बेबी : मग ठरलं तर... (जिनसा उचलून आतल्या घरात जाते. लिलीही तिच्यामागे जिनसा घेऊन निघते. पण वर्मा तिच्याजवळचं सामान आपल्या हातात घेत...)

वर्मा : मीच व्यवस्थित लावून येतो

(वर्मा आत जातो. वर्मा परत येईपर्यंत लिली व सुब्रत अगदी मोकळ्या मनाने गप्पा मारीत असतात. बोलता बोलता लिली फळं व स्नॅक्स खाते व सुब्रतलाही देत असते.)

लिली : मी खरं म्हणजे येणार नव्हते.

सुब्रत : का?

लिली : वर्मा म्हणजे काही तू नव्हेस.

सुब्रत : म्हणजे?

लिली : बेबीच्या वयात मी बेबीसारखी होते.

सुब्रत : (काही न समजून) ठीकच आहे.

लिली : मी एव्हढी जाड नव्हते.

सुब्रत : जाड?

लिली : वर्मा म्हणतात मी खूप जाड झाले आहे.

सुब्रत : तो फॉरेस्ट कॉन्ट्रॅक्टर आहे नं... टूरसाठी इतकं जाड शरीर गैरसोयीचं होतं.

लिली : टूर करणं माझं काम नव्हे.

सुब्रत : नाही... म्हणजे...

लिली : ते इतकी टूर करतात तरी काय स्वत: इतके बारीक आहेत का?

सुब्रत : मग?

लिली : नापास.

सुब्रत : नापास?

लिली : एकेका वर्गात चार पाच वर्षं.

सुब्रत : (हसत हसत) ओह.

लिली : मॅट्रीकचा शिक्का काही लागू शकला नाही.

सुब्रत : मला हे माहीत नव्हतं...

लिली : मग बर्माला गेले.

सुब्रत : अच्छा!

लिली : तिथेच फॉरेस्टच काम शिकले.

सुब्रत : ओ हो.

लिली : ते ही गोष्ट कुणालाच सांगत नाहीत.

सुब्रत : पण तुम्ही मला...

लिली : च... च...

सुब्रत : तुम्हीसुद्धा बर्माला त्यांच्याबरोबर...

लिली : नाही... ते तिथून आल्यानंतर!

सुब्रत : ओ हो.

लिली : तुम्ही?

सुब्रत : काय?

लिली : कधी त्यांच्याबरोबर...

सुब्रत : कोण बेबी?

लिली : नाही ह्यांच्याबरोबर...

सुब्रत : वर्माबरोबर.

लिली : हो!

सुब्रत : आठवत नाही. शाळेत खालच्या वर्गात एकत्र शिकत होतो. त्यानंतर...

लिली : मागच्यावर्षी...

सुब्रत : घरासाठी लाकूड आणण्यासाठी सॉ मीलला गेलो होतो. तिथे वर्मा भेटला.

लिली : त्यादिवशी संध्याकाळी मला येऊन म्हणाले...

सुब्रत : काय?

लिली : तुम्हाला जेवायला बोलावलं आहे म्हणून.

सुब्रत : जुनी ओळख निघाली. खूप वर्षांनी भेटलो.

लिली : खरंच आहे.

सुब्रत : त्यादिवशी इतकं काही खायला घातलंत...

लिली : लक्षात रहाण्यासारखं...?

सुब्रत : म्हणून तर लक्षात राहिलं आहे.

लिली : त्यानंतर तुमच्या घरी आम्हाला बोलावून खायला घातलंत

सुब्रत : ते बेबीचं क्रेडिट.

लिली : तुमचं काही नाही.

सुब्रत : माझं?

लिली : नाही कशाला म्हणता?

सुब्रत : ठीक आहे.

लिली : पण काही बोलला नाहीत.

सुब्रत : कशाबद्दल?

लिली : (त्याच्या जवळ जात) मी खरंच का जाड झाले आहे?

सुब्रत : अरे कुठे? जास्त नाही.

लिली : वर्मा म्हणतात.

सुब्रत : Sad.

लिली : (आनंदाने) खरंच?

सुब्रत : (हसत हसत) अगदी खरं...

लिली : तुम्ही जा.

सुब्रत : कुठे?

लिली : ती दोघं...

सुब्रत : खोली लावत असतील.

लिली : तुम्हाला इथे आवडलं?

सुब्रत : घर का जागा?

लिली : जागा

सुब्रत : सुंदर... वर्मांचा चॉईस.

लिली : नो. (सुब्रत आश्चर्याने बघतो) माझा...

सुब्रत : पण तुम्ही म्हणाला होतात...

लिली : मी खरंच येणार नव्हते.

सुब्रत : का?

लिली : ह्यांना भटकायला आवडतं.

सुब्रत : म्हणजे? कळलं नाही?

लिली : ह्यांना एकटं एकटं फिरायला आवडतं.

सुब्रत : बेबीही तेच म्हणते.

लिली : काय?

सुब्रत : मला एकटं रहायला आवडतं...
(वर्मा आत येतो)

वर्मा : झकास!

सुब्रत : (उरलेल्या जिनसा घाईघाईने उचलायला लागतो)

वर्मा : राहू देत... नंतर

सुब्रत : नंतर...

वर्मा : तू इथे बिझी होतीस... मी बेबीताईंना म्हणालो (बेबी हातात गरम किटली घेऊन आत येत)

बेबी : चौकीदार हुशार आहे. घराच्या कोपऱ्यात एक चूलपण!

लिली : पाणी गरम होतं?

वर्मा : उकळत होतं.

(वर्मा एका बॉक्समधून कप काढतो. सगळे टेबलाच्या चारी बाजूला बसतात. बेबी चहा कपात ओतते. चहा पिता पिता बोलत असतात)

सुब्रत : स्नॅक्स्.

लिली : नको.

वर्मा : सांग पाहू ही चहा बनवण्याची आयडिया माझ्या मनात कशी आली.

बेबी : जंगलाचे कॉन्ट्रॅक्टर जास्त चहा पितात.

लिली : अवेळीही.

वर्मा : चहासाठी वेळ अवेळ थोडंच कोणी बघतं.

सुब्रत : पण सवय वाईट.

बेबी : सुब्रतला तर चहा पिण्यासाठीसुद्धा वेळ नसतो.

वर्मा : म्हणजे?

बेबी : तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक...

लिली : विसरत असतील.

बेबी : तसं नाही.

वर्मा : सुब्रत!

बेबी : सांगितलं नं, वेळ होत नाही.

वर्मा : स्ट्रेंज.

बेबी : कॉलेजमधून आले की स्टडीरूममध्ये घुसतात.

लिली : तिथे चहा प्यायला काय प्रॉब्लेम आहे?

बेबी : आतून दरवाजा बंद करून घेतात.

लिली : आतून?

सुब्रत : एकांतात अभ्यास.

बेबी : उशिरा रात्रीपर्यंत तिथेच.

वर्मा : ओ हो...

बेबी : अपरात्री केव्हातरी बाहेर येतात!

सुब्रत : तेव्हा चहाची गरज भासत नाही.

लिली : सकाळी?

बेबी : रुटीन... एक कप.

सुब्रत : साखर...

लिली : तुम्हाला?

वर्मा : नको... (लिली बेबीकडे बघते)

बेबी : मी कमीच घेते...

(सुब्रत चहाचा कप उचलतो. लिली त्याचा हात धरते)

लिली : राहू दे. मलाही थोडी लागेल. (शेजारच्या खोलीत जाते)

वर्मा : मी बेबीला सांगत होतो.

सुब्रत : काय?

वर्मा : इथे येण्याबद्दल.

सुब्रत : (हसत) ओ...

बेबी : (लिलीला येता बघून) मिळाली?

लिली : (एका पॅकेटमधून चमच्याने साखर सुब्रतच्या कपात घालते) आणखी?

सुब्रत : बेबी माझ्यावर रागावली आहे.

लिली : का?

वर्मा : इथे येण्याबद्दल सुब्रत त्यांना काही बोलला नव्हता.

लिली : तुम्ही तर इथे येऊन तीन दिवस राहण्यासाठी सगळी व्यवस्था केली होतीत.

वर्मा : तीच गोष्ट सुब्रत बेबीला बोलला नव्हता.

सुब्रत : मी म्हणालो सुटी आहे चल चांगल्या ठिकाणी जाऊ या.

बेबी : मला वाटलं आणखी कुठेतरी.

सुब्रत : आणखी कुठे? ही जागा काय वाईट आहे?

वर्मा : शांतपणे दोनतीन दिवस राहून...

बेबी : बंदूक आणली आहे. शिकार करण्यासाठी.

लिली : वाघाची शिकार?

बेबी : शेळ्या! चौकीदारांनी शेळी ठेवली आहे. (सगळे जोरात हसतात)

लिली : दोन वर्षांपूर्वी असेच एकदा आलो होतो...

वर्मा : ओह... त्यावेळी मिळाली नाही म्हणून ह्याहीवेळी मिळणार नाही असं थोडच आहे.

सुब्रत : Luck. . .

वर्मा : ह्यावेळेस मी नक्कीच लकी आहे.

लिली : (उजव्या बाजूच्या खोलीकडे बघत) तुम्ही त्या खोलीत रहा.

सुब्रत : (डाव्या बाजूच्या खोलीकडे बघत) ती खोली स्वच्छ आहे नं?

वर्मा : (हसून) चौकीदार त्याच्या कामात तरबेज आहे.

बेबी : (उठून डाव्या बाजूच्या खोलीकडे बघत) पण त्या खोलीपेक्षा लहान आहे.

लिली : चालेल! त्या खोलीच्या बाहेर व्हरांडा आहे.

सुब्रत : व्हरांडा? म्हणजे ... तुला कसं...

लिली : मी तुला सांगितलं नव्हतं का की मागे एकदा आले होते.

सुब्रत : ओह...

वर्मा : गेल्यावर्षी वसंतऋतूत आपण इथे आलो होतो. आठवतं नं लिली?

लिली : हो नं!

वर्मा : तिला त्याच खोलीत बरं वाटेल.

लिली : राहू दे हो!

(चहा व खाणं संपलेलं आहे. बेबी लिली कपबशा उचलून कोपऱ्यात ठेवलेल्या पेटाऱ्यावर ठेवतात)

वर्मा : तुम्ही सारख्या त्या बाहेरच्या व्हरांड्यात बसून रहायच्यात ना?

लिली : तुम्हाला कसं माहीत सारखी बसायची? तुम्ही तर जे शिकारीला गेलात ते दोन दिवसांनी परत आलात.

सुब्रत : जेव्हा ते इथे असतील तेव्हा बघितलं असेल.

वर्मा : खोटं?

लिली : झालं!

वर्मा : आता नाही बसू शकणार.

लिली : का नाही?

वर्मा : काय सुब्रत?

सुब्रत : ना... नाही.

बेबी : का नाही?

वर्मा : इथे येण्यासाठी जेव्हा सुब्रतनी प्रस्ताव मांडला...

सुब्रत : इथे येण्याची कल्पना तुमची होती.

वर्मा : मी... मी... मी म्हणालो तिथे जाऊन आपण सगळं विसरून जाऊ या.

बेबी : (शहारून जात) सगळं विसरूया?

वर्मा : (एकदम काय बोलायचं ते न समजून) कोणाची काही सवय... आणखी काही... कोणी...

सुब्रत : (रसिकपणाने) तू माझ्या सुटकेसमध्ये पुस्तक शोधीत होतीस ना? ... मी पुस्तकं आणली नाहीत.

लिली : इथे बसून वाचायला काही स्टडीरूम नाहीए.

वर्मा : (लिलीला चिडवण्यासाठी) तुम्हाला त्या व्हरांड्यात बसता येणार नाही.

लिली : (हसत हसत) तुला कसली सवय आहे बेबी?

बेबी : हे दिवसरात्र स्टडीत जाऊन बसले की मी बाहेर फिरायला जायची.

सुब्रत : (हसत हसत) मग तुलाही बाहेर फिरायला जाता येणार नाही. इथेच बसून रहावं लागेल.

बेबी : (एकदम मटकन खाली बसून) बसून राहू?

वर्मा : चालणार नाही.

बेबी : म्हणजे?

वर्मा : चहा पिऊन आता तरतरीत वाटतंय...

सुब्रत : किती वाजले? (स्वत:च्या घड्याळात बघत) माझं घड्याळ बंद पडलंय.

वर्मा : चार...

सुब्रत : (घड्याळ नीट करीत) चौकीदार रात्रीच्या जेवणाचं...

लिली : नको आपणच करूया, काय बेबी?

बेबी : हो, ठीक आहे.

वर्मा : (आश्चर्याने रसिकपणाने) काय... काय तुम्ही करणार?

लिली : (नाटकीपणाने रसिकता दाखवत) जी हुजूर!

(त्यानंतर बंदूक व इतर आणखी जिनसा घेऊन डाव्या खोलीत जाते. बेबी काही जिनसा घेऊन उजव्या खोलीत जाते.)

वर्मा : माझा अजूनही विश्वास नाही.

सुब्रत : कशाबद्दल?

वर्मा : लिली स्वयंपाक करणार त्यावर.

सुब्रत : का?

वर्मा : इतकी लठ्ठ आणि विस्तवाजवळ!

सुब्रत : ओ हो हो ... (करत हसत सुटतो)

वर्मा : फिरतीवर असलो की मी लिलीला बरोबर नेत नाही.

सुब्रत : Sad.

वर्मा : बेबी करते का चांगला स्वयंपाक?

सुब्रत : वाईटही नसतो. (काही वेळ दोघं गप्प बसतात)

वर्मा : बाहेर जाऊ या...

सुब्रत : आत्ता?

वर्मा : जागा बघून येऊ या.

सुब्रत : जागा?

वर्मा : म्हणजे Spotting. . . आख्खी रात्र जागून वाट बघावी लागेल... शिकार...

(तेव्हढ्यात लिली आत येते)

लिली : चला.

वर्मा : कुठे?

लिली : शिकारीच्या जागी.

वर्मा : तुम्ही येणार?

बेबी : (आत येत) चौकीदार कुठे गेला?

सुब्रत : तो त्याच्या घरात असेल.

बेबी : (खिडकीजवळ जाऊन) चौकीदार

वर्मा : (बेबीला उद्देशून) तुम्हीही चला.

बेबी : कुठे?

लिली : चल बघून तर येऊ या. वर्मासाहेब रात्री कुठे बसून शिकार करणार आहेत ते?

वर्मा : झऱ्याजवळ अगोदरच चांगली जागा बघून ठेवू या. (चौकीदार येतो)

चौकीदार : काय काम होतं बाईसाहेब?

बेबी : स्वयंपाक करायला कुठे सोईचं होईल, या खोलीत (उजव्या खोलीकडे

बोट दाखवत) का त्या?...

सुब्रत : स्वयंपाकघरातच नाही का सोयीचं होणार?

चौकीदार : सगळ्या सोयी आहेत साहेब... पण...

वर्मा : मग अडचण काय आहे?

चौकीदार : सांगत नव्हतो का साहेब... माझी शेळी... भात, पोळी, भाजी... कशाचाही वास आला की खाण्यासाठी में में में करत राहील. कितीही खाल्लं तरी तिचं पोट भरत नाही.

सुब्रत : (हसत हसत) शेळीच कापून खाल्ली तर?

लिली : शेळीची काय किंमत आहे रे?

चौकीदार : (भांबावून अगतिकपणे) साहेब जी!!!

वर्मा : अरे नाही रे ते गंमतीने म्हणत आहेत.

बेबी : मग ह्या खोलीत (म्हणत उजव्या खोलीकडे जायला लागते)

वर्मा : मग तुम्ही येणार नाही?

बेबी : नाही.

लिली : मी येणार.

वर्मा : तू तरी कशाला येणार?

सुब्रत : लागलीच परत यायचं आहे तर?

वर्मा : जागा बघून लगेच.

बेबी : तोपर्यंत मी भाजी चिरून ठेवते.

लिली : ह्यांना जर उशीर व्हायला लागला तर मी परत येईन.

बेबी : चौकीदार वाटण वाटता येईल तर?

चौकीदार : जी! कोणीही इथे आलं तरी वाटण मीच वाटतो.

बेबी : मग काहीच त्रास नाही. (बेबी उजव्या हातच्या खोलीत जाते)

वर्मा : लिली जरा बंदूक (लिली डाव्या खोलीत जाते)

सुब्रत : बंदूक कशासाठी?

वर्मा : बंदूक न घेता जाणं ठीक नाही.

चौकीदार : इथे दिवसाढवळ्या वाघ येत नाहीत. पण काय सांगावं... काहीवेळा जंगल म्हटलं की ...

(लिली बंदूक घेऊन येते)

वर्मा : दे आण इकडे.

लिली : मी धरणार. (म्हणत स्वत:च्या खांद्याला अडकवते)

वर्मा : आणि बंदूकीच्या गोळ्या?

लिली : (उजव्या खोलीकडे जाता जाता) .... ह्या खोलीत.

सुब्रत : मी आणतो. किती आणू?

वर्मा : अगदी थोड्या दोन-चार...

(सुब्रत उजव्या हातच्या खोलीत जातो)

चौकीदार!

चौकीदार : जी साहेब.

वर्मा : बंगला सोडून कुठेही जाऊ नकोस.

चौकीदार : जी साहेब.

वर्मा : बाईसाहेब इथे इकट्या आहेत.

चौकीदार : जी साहेब!

(सुब्रत येतो)

सुब्रत : मी चार आणल्या आहेत.

वर्मा : (लिलीकडे बघत) चला जाऊ या.

(लिली, वर्मा आणि सुब्रत जातात. चौकीदार टेबल पुसत असतो. तेव्हढ्यात शेळीच ओरडणं ऐकू येतं. चौकीदार उजव्या खोलीच्या दाराजवळ जाऊन)

चौकीदार : बाईसाहेब!

(बेबी एका थाळीत कांदे-बटाटे घेऊन येते)

बेबी : काय रे?

चौकीदार : ती शेळी

बेबी : ती अशी का ओरडतीय?

चौकीदार : सगळे बाहेर गेले ना, तिच्या समोरूनच गेले.

बेबी : मग?

चौकीदार : (संकोचाने) ती अतिशय हुशार शेळी आहे. नवखं कोणी आलं की ती सारखी अशीच ओरडत राहते.

बेबी : अच्छा.

चौकादीर : मुठभर चुरमुरे, एकदोन बिस्किटे, भाज्यांची सालं.....

बेबी : ओ...

चौकीदार : चुरमुरे आहेत का? काहीतरी तिच्यापुढे टाकलं की तिचं ओरडणं बंद होईल.

बेबी : अच्छा... अच्छा. ठीक आहे. बघते.

(टेबलावर ताटली ठेवून आत जाते आणि २/४ बिस्किटे आणून चौकीदाराला देते. तो बाहेर जातो. बेबी बटाटे चिरायला घेते. शेळीचं ओरडणं बंद होतं. तेव्हढ्यात वर्मा आत येतो)

हे काय परत आलात?

वर्मा : (दारातून बाहेर बघत) इकडे या.

बेबी : कोण आहे?

वर्मा : एकट्या बसून कंटाळलात का?

बेबी : तुम्हांला विचारतेय, कोण आहे?

वर्मा : लिली व सुब्रत बघता बघता पुढे गेले.

बेबी : तुम्ही मागे राहिलात?

वर्मा : मागे राहिलो म्हणून तर फायदा झाला.

बेबी : फायदा?

वर्मा : हं! हे गृहस्थ भेटले.

बेबी : गृहस्थ!

वर्मा : खाली गाडीजवळ उभे होते.

बेबी : पण कोण? कुठले गृहस्थ?

वर्मा : विचारत होते, Spare Battery आहे?

बेबी : Battery?

वर्मा : म्हणाले त्यांची गाडी वाटेत एकाएकी बिघडली.

बेबी : गाडी?

वर्मा : मी म्हणालो...

बेबी : म्हणजे?

वर्मा : मी म्हणालो गाडीचा विचार नंतर करू. तुम्ही अडचणीत आहात. आजची रात्र तुम्ही आमच्याबरोबर रहा.

बेबी : वर्मासाहेब!

वर्मा : रात्रीची वेळ... जंगलात ते कुठे जाणार?

बेबी : म्हणजे, तुम्हाला म्हणायचं काय?

वर्मा : बघू या... आम्ही सगळे परत आलो की करू त्यांच्या रहाण्याची व्यवस्था.

(संग्राम आत येतो. क्षीण किर्डकिर्डीत अंगाचा. मळक्या कपड्यातला. पण डोळे तीक्ष्ण, धारदार. बोलण्यात ठामपणा. आत येऊन तो बेबीकडे एकटक बघत राहतो. बेबी निरुपाय होऊन असहायपणे उभी असते.)

बेबी : ते...

वर्मा : ओ... ही बेबीताई, माझे प्रोफेसम मित्र सुब्रत यांच्या पत्नी.

संग्राम : ओ...

वर्मा : (घाईघाईत) तुम्ही दोघं गप्पा मारा. काही अडचण नाही ना...

संग्राम : (चारीबाजूला नजर फिरवून) नाही. काही अडचण नाही.

वर्मा : अं... काय आपलं नाव काय बरं म्हणालात?

संग्राम : संग्राम

बेबी : (जोरात हसते) संग्राम... हं...हं त्याशिवाय का ह्या डोंगरदऱ्यात...

संग्राम : Prospecting सोन्याच्या खाणींच्या शोधात.

वर्मा : आश्चर्य आहे.

संग्राम : खूपच Risky कारण...

वर्मा : ते जाऊ दे. नंतर बघू. Excuse Me. ती दोघं खूप पुढे गेले असतील.

बेबी : जंगलातला रस्ता, जाऊन जाऊन कुठे जाणार?

वर्मा : झऱ्याजवळ नक्की गेले असतील. तो Spot.

(वर्मा बाहेर जातो. बेबी थकल्यासारखी खाली बसून भाजी चिरायला घेते. संग्राम घरभर फिरून शांतपणाने त्या भिंतीवर टांगलेली चित्रं बघत असतो. थोडा वेळ गेल्यावर...)

संग्राम : नवीन लावलेली दिसत आहेत. पण जंगलात ही जंगलीच चित्रं का? हरणाच्या मागे वाघ. वाघाच्या मागे हरिण, असं चित्र असतं तर कसं वाटलं असतं?

(एकदोनदा शेळीच ओरडणं ऐकू येतं. संग्राम खिडकीजवळ जातो)

आधीच्या चौकीदाराकडे शेळी नव्हती.

बेबी : (सहन न होऊन उभी राहते) उगाचच फालतू बडबड करू नकोस संग्राम.

संग्राम : आधीच्या चौकीदाराकडे होती शेळी?

बेबी : संग्राम!

संग्राम : वर्मासाहेब म्हणत होते...

बेबी : संग्राम!

संग्राम : श्रीयुत वर्मा. तुझ्या यजमानांचे मित्र.

बेबी : ओह!!

संग्राम : तुला नक्की एकटं एकटं वाटत असेल.

बेबी : संग्राम!

संग्राम : ते परत येईपर्यंत आपण गप्पा मारूया.

बेबी : पुरे पुरे! आता इथेच थांब.

संग्राम : तू कोणत्या खोलीत आहेस?

बेबी : (उजवीकडे बोट दाखवित) त्या खोलीत.

संग्राम : कॉलेजमध्ये शिकत असताना मी एकदा त्या खोलीत येऊन राहिलो होतो.

बेबी : संग्राम.

संग्राम : तेव्हा आणखी एकालासुद्धा मी बोलावलं होतं.

बेबी : नाही.

संग्राम : कॉलेजमध्ये असताना मी नाटकात काम करायचो.

बेबी : अभिनेता!

संग्राम : आता मी तो डोंगर लिजवर घेतलाय आणि सोन्याच्या खाणीच्या शोधात आहे.

(बेबी सुरी उचलते आणि कांदा कापायला लागते)

नाही, नाही. तसं कापू नको. तुझा हात कापेल.

(संग्राम कांदा घेऊन टेबलावर ठेवून कांदा कापून दाखवतो)

कांदा असा कापायचा.

बेबी : (त्रासिकपणे) ओह...

संग्राम : हं! काय बरं मी सांगत होतो? कॉलेजमध्ये असताना अभिनय...

बेबी : सोन्याची खाण... खोटं.

संग्राम : कॉलेजमध्ये मी असतानाची गोष्ट... मी वरच्या वर्गात होतो. अभ्यासतही चांगला.

बेबी : सोन्याच्या खाणीच्या शोधात .... खोटं.

संग्राम : ज्याच्याजवळ पैसा नाही... तो गरीब.

बेबी : हे काम तू केव्हापासून सुरू केलंस?

संग्राम : ह्याच डाकबंगल्यात मी एकाला बोलावलं होतं. कॉलेजच्या नाटकानंतर.

बेबी : तुला कसं समजलं की इथे सोन्याची खाण आहे म्हणून?

संग्राम : ओळखीचं रूपांतर मैत्रीत झालं होतं.

बेबी : किती पैसे गुंतवलेस ह्यात तू?

संग्राम : मोठ्या सधनघरची मुलगी. तरीसुद्धा पाहताक्षणीच प्रेमात पडलो.

बेबी : एव्हढा पैसा तू कुठून आणलास?

संग्राम : नाटकात आम्ही एकत्र काम केलं. आणि मग आम्ही आणखी जवळ आलो.

बेबी : इथे खाणी आहेत सोन्याच्या ते कसं समजलं तुला?

संग्राम : नाटकाच्या दुसऱ्यादिवशी कॉलेजच्या व्हरांड्यात आम्ही एकांतात भेटलो.

बेबी : साफ खोटं... सोन्याची खाण नव्हे. आणखीन काहीतरी.

संग्राम : कानातली ती कुजबूज... हुरहूर... भिती... दहशत... ते आकर्षण...

बेबी : आता तरी सांग कशासाठी?

संग्राम : मग कबुली - मन उघडं करणं...

बेबी : ह्या डोंगरात सोन्याच्या खाणी? अगदी खोटं.

संग्राम : तिचा माझ्यावर विश्वास बसला नाही. ज्यांचा नावलौकिक आहे, ज्यांच्याजवळ संपत्ती आहे ते दुसऱ्यांवर विश्वास ठेवीत नाहीत.

बेबी : अरे मी तुला विचारते आहे. सोन्याच्या खाणीबाबत सगळं खोटं आहे नं?

संग्राम : शेक्सपिअरने मला मदत केली.

बेबी : संग्राम.

संग्राम : एकदम मला रोमिओचे शब्द आठवले.

बेबी : ओह...

संग्राम : स्त्रीच्या प्रेमनिवेदनावर रोमियोचं उत्तर.

बेबी : संग्राम.

संग्राम : रोमियोचं उत्तर माझ्या अगदी ओठावर आहे.

बेबी : शुद्ध वेडेपणा.

संग्राम : 'Call me but love & I will be new baptized'.

बेबी : संग्राम!

संग्राम : मग काही दिवसानंतर निमंत्रण.

बेबी : संग्राम

संग्राम : ह्याच जागी, ह्याच डाकबंगल्यावर.

बेबी : खोटं... साफ खोटं... सगळं नाटक...

(संग्राम हसत हसत बेबीच्या जवळ जातो)

संग्राम : ते सगळे आत परत येत असतील.

बेबी : येऊ देत.

संग्राम : तुला असं का वाटतं की मी सोन्याच्या खाणीच्या शोधात नाही आहे?

बेबी : आहेस तू?

संग्राम : हो.

बेबी : नाही.

संग्राम : फक्त नाटक?

बेबी : आणखी काय?

संग्राम : (जाता जाता) ठीक आहे.

बेबी : संग्राम... पण

संग्राम : (जरा थांबून) पण तू इथे कशी?

बेबी : Picnic

संग्राम : छान... ही जागा सुंदर आहे.

बेबी : तुला आठवतं?

संग्राम : काय?

बेबी : त्यादिवशी आपण आपल्या लग्नाचं ठरवणार होतो?

संग्राम : नाटक?

बेबी : नाही.

संग्राम : त्यादिवशी डाकबंगल्यात आणखीही कोणीतरी होतं.

बेबी : हो (थकून) होतं. आणखी कोणीतरी.

संग्राम : चिडून, रागाने तू इथून निघून गेलीस.

बेबी : तू आणि ती...

संग्राम : ती लठ्ठ बाई, तुझ्यापेक्षा मोठी.

बेबी : शी...

संग्राम : (उजव्या हाताच्या खोलीकडे बघत) ह्या खोलीत तू झोपून गेली होतीस.

बेबी : पुरे झालं.

संग्राम : (डाव्या हाताच्या खोलीकडे बघत) आणि त्या खोलीत ती एकटी होती.

बेबी : ओह, बस कर आता.

संग्राम : तुझा नवरा प्रोफेसर आहे, हो नं?

बेबी : हो

संग्राम : मी होऊ शकलो नाही.

बेबी : सोन्याच्या खाणीत जास्त फायदा...

संग्राम : बघू या.

(चौकीदार येतो)

चौकीदार : त्या लोकांना परतायला उशीर होईल असं वाटतं. स्वयंपाकासाठी पाणी ठेवू का?

संग्राम : तू स्वयंपाक करणार?

बेबी : Picnic.

संग्राम : ओ...

चौकीदार : स्वयंपाकासाठी...

बेबी : नाही त्यांना परत येऊ देत.

(चौकीदार जायला लागतो)

संग्राम : चौकीदार

संग्राम : एकदम मला रोमिओचे शब्द आठवले.

बेबी : ओह...

संग्राम : स्त्रीच्या प्रेमनिवेदनावर रोमियोचं उत्तर.

बेबी : संग्राम.

संग्राम : रोमियोचं उत्तर माझ्या अगदी ओठावर आहे.

बेबी : शुद्ध वेडेपणा.

संग्राम : 'Call me but love & I will be new baptized'.

बेबी : संग्राम!

संग्राम : मग काही दिवसानंतर निमंत्रण.

बेबी : संग्राम

संग्राम : ह्याच जागी, ह्याच डाकबंगल्यावर.

बेबी : खोटं... साफ खोटं... सगळं नाटक...

(संग्राम हसत हसत बेबीच्या जवळ जातो)

संग्राम : ते सगळे आत परत येत असतील.

बेबी : येऊ देत.

संग्राम : तुला असं का वाटतं की मी सोन्याच्या खाणीच्या शोधात नाही आहे?

बेबी : आहेस तू?

संग्राम : हो.

बेबी : नाही.

संग्राम : फक्त नाटक?

बेबी : आणखी काय?

संग्राम : (जाता जाता) ठीक आहे.

बेबी : संग्राम... पण

संग्राम : (जरा थांबून) पण तू इथे कशी?

बेबी : Picnic

संग्राम : छान... ही जागा सुंदर आहे.

बेबी : तुला आठवतं?

संग्राम : काय?

बेबी : त्यादिवशी आपण आपल्या लग्नाचं ठरवणार होतो?

संग्राम : नाटक?

बेबी : नाही.

संग्राम : त्यादिवशी डाकबंगल्यात आणखीही कोणीतरी होतं.

बेबी : हो (थकून) होतं. आणखी कोणीतरी.

संग्राम : चिडून, रागाने तू इथून निघून गेलीस.

बेबी : तू आणि ती...

संग्राम : ती लठ्ठ बाई, तुझ्यापेक्षा मोठी.

बेबी : शी...

संग्राम : (उजव्या हाताच्या खोलीकडे बघत) ह्या खोलीत तू झोपून गेली होतीस.

बेबी : पुरे झालं.

संग्राम : (डाव्या हाताच्या खोलीकडे बघत) आणि त्या खोलीत ती एकटी होती.

बेबी : ओह, बस कर आता.

संग्राम : तुझा नवरा प्रोफेसर आहे, हो नं?

बेबी : हो

संग्राम : मी होऊ शकलो नाही.

बेबी : सोन्याच्या खाणीत जास्त फायदा...

संग्राम : बघू या.

(चौकीदार येतो)

चौकीदार : त्या लोकांना परतायला उशीर होईल असं वाटतं. स्वयंपाकासाठी पाणी ठेवू का?

संग्राम : तू स्वयंपाक करणार?

बेबी : Picnic.

संग्राम : ओ...

चौकीदार : स्वयंपाकासाठी...

बेबी : नाही त्यांना परत येऊ देत.

(चौकीदार जायला लागतो)

संग्राम : चौकीदार

चौकीदार : (थांबतो) जी साहेब.

संग्राम : आजची रात्र मी तुझ्या खोलीत झोपीन.

चौकीदार : (चमकून) माझ्या खोलीत साहेब?

संग्राम : चालेल, मी चालवून घेईन.

चौकीदार : साहेब तुम्ही?

संग्राम : तुला बक्षिसीही देईन नंतर.

चौकीदार : जी साहेब. (खुशीत येऊन म्हणतो.)

बेबी : तू जा आता आणि बोलावलं की आत ये.

संग्राम : हं बोलावलं, बोलावलकीच ये.

चौकीदार : जी... जी साहेब.

(चौकीदार बाहेर जातो)

बेबी : तू चौकीदाराच्या खोलीत...

संग्राम : मला डोंगरदऱ्यामधून फिरावं लागते. सवय झाली आहे.

बेबी : पण...

संग्राम : ह्या खोलीत तू, आणि त्या खोलीत नक्कीच वर्मासाहेब.

बेबी : वर्मासाहेब... आणि...

संग्राम : आणि कोण?

बेबी : लिली.

संग्राम : लिली?

बेबी : तुला आठवत नाही? लिली...

संग्राम : लिली?

बेबी : ती लठ्ठ... माझ्यापेक्षा मोठी...

संग्राम : (विचार करत) लठ्ठ... मोठी... तू कोणाबद्दल...

बेबी : पुन्हा नाटक?

संग्राम : विश्वास ठेव. मी तिचं नाव विचारलं नव्हतं. म्हणून मला माहित नाही.

बेबी : श्रीयुत वर्मांची बायको.

संग्राम : तीसुद्धा...

बेबी : तुझं नाटक पुरे झालं.

संग्राम : विश्वास ठेव तुझ्यापाठोपाठ मीही बाहेर पडलो होतो.

बेबी : माझा अजिबात विश्वास नाही.

संग्राम : लिली... मिस्टर वर्मांची बायको.

बेबी : तू का निघून गेलास?

संग्राम : का? (हसतो) मूर्ख...

बेबी : संग्राम.

संग्राम : प्रोफेसर काय अगदी संतमाणूस आहे का?

बेबी : संग्राम.

संग्राम : मी कधीच चरित्रवान नव्हतो.

बेबी : का आलास तू इथे?

संग्राम : Picnic

बेबी : लिलीसाठी?

संग्राम : तुझ्यासाठी नाही?

बेबी : शी... अजिबात नाही.

संग्राम : (विचार करत) लिली... तू... मी...तुझा नवरा... लिलीचा नवरा...

बेबी : तू इथून निघून जा बरं.

संग्राम : लिलीला माहित आहे?

बेबी : काय?

संग्राम : जे तू बघितलं होतंस?

बेबी : नाही.

संग्राम : वाचलो!

बेबी : माझा लिलीशी परिचय खूप नंतर झाला.

संग्राम : तुझा नवरा?

बेबी : त्याच्याबद्दल काय?

संग्राम : मी... माझ्याबद्दल?

बेबी : नाही.

संग्राम : (हसत हसत अगदी ठामपणाने) मी जाणार नाही.

बेबी : संग्राम

संग्राम : मी एक अनोळखी पाहुणा... अभिनेता...

बेबी : (असहायपणे बघत) अभिनेता...

संग्राम : अभिनेत्याने आता नाटक सोडून नव्या कामात हात घातलाय. सोन्याच्या खाणीचा शोध... pure... pure gold. रानातवनात भटकणे... सवय झालीय मला त्याची... मी सहज चौकीदाराच्या घरात चालवून घेईन.

बेबी : ओह... (काही सहन न होऊन अधिरपणे खिडकीपाशी जाते) लिली येते आहे.

संग्राम : लिली!

बेबी : लिली... वर्मा...

(बेबी उजव्या हातच्या खोलीत जाते. संग्राम वळून बघतो तेव्हाच वर्मा आत येतो)

संग्राम : (वर्माकडे बघून) Spot निवडला?

वर्मा : नाही.

संग्राम : झऱ्याच्या पलिकडे.

वर्मा : कोणीतरी जंगल कापून साफ केलं आहे.

संग्राम : तुम्ही आणखी थोडं पुढं गेला असतात तर कदाचित्...

वर्मा : नाही. आज आता शक्य नाही.

संग्राम : उद्या बघणार का?

वर्मा : उद्याचा संपूर्ण दिवस हातात आहे. उद्या नक्की.

संग्राम : हरिण किंवा रानडुक्कर मिळेल.

वर्मा : हरणं मी खूप मारली आहेत. त्यात मला रस नाही.

संग्राम : मग वाघ?

वर्मा : वाघ....

संग्राम : अशक्य नाही. मिळू शकतो.

वर्मा : बघुया.

सुब्रत : (सुब्रत आत येतो. वर्माला म्हणतो-) किती लवकर पायऱ्या चढून आलात.

संग्राम : High Jump.

सुब्रत : (हसत हसत) High Jump... Interesting...

वर्मा : (हसत हसत) फारच Interesting हे सद्गृहस्थ...

संग्राम : वाटेत माझी गाडी बिघडली... चालत चालत...

सुब्रत : मला माहिती आहे.

संग्राम : फक्त आजची रात्र.

सुब्रत : हो. वर्मासाहेब आम्हाला सांगत होते, बरं झालं आलात ते.

(लिली आत येते खांद्यावरून बंदूक काढते)

लिली : ओह...

वर्मा : (ओळख करून देत) लिली

संग्राम : ओह...

सुब्रत : ह्या Mrs. वर्मा (जोराने हाक मारतो) बेबी...

वर्मा : (लिलीला) हे सद्गृहस्थ

सुब्रत : जंगलातल्या खाणी...

संग्राम : तुम्ही माझ्याबद्दल सगळं सांगितलं आहे वाटतं?

वर्मा : जे काही थोडंबहुत माहित होतं ते.

संग्राम : मी शोधात आहे.

सुब्रत : सोन्याच्या खाणींच्या.

संग्राम : हं...

लिली : (डोळ्यात आश्चर्य) सोन्याच्या खाणी...

संग्राम : हो. सोनं शोधतोय.

(बेबी येते)

सुब्रत : तुला माहिती आहे, बेबी...

बेबी : हं...!

वर्मा : मी विसरत आहे... तुमचं नाव...

बेबी : अभिनेता...

वर्मा-सुब्रत : अभिनेता!

संग्राम : Actor कॉलेजमध्ये मी खूप नाटकातून काम करायचो.

वर्मा : Good

लिली : त्यात good काय?

वर्मा : बेबीची आधीपासूनची ओळख आहे.

लिली : बेबीची?

बेबी : हो माझी... फक्त माझी...

सुब्रत : फालतू...

(शेळी ओरडते)

वर्मा : काय फालतू?

लिली : चौकीदाराची शेळी...

संग्राम : थोडे चुरमुरे किंवा बिस्किटं...

बेबी : (एकदम विमनस्कपणे उठते) शेळी एक पाळीव प्राणी आहे...

(ती जायला लागते)

सुब्रत : बेबी...

वर्मा : (बेबीचे शब्द हेटाळणीच्या स्वरात तसेच म्हणत) शेळी एक पाळीव प्राणी आहे. (जोरजोरात हसतो)

सुब्रत : वर्मासाहेब...

वर्मा : (एकदम उठतो) एक दोन बिस्किटं तिच्यापुढे टाकून येतो. (वर्मा जातो)

संग्राम : तरी ती ओरडत राहील.

सुब्रत : बिस्किटं खाऊनसुद्धा.

संग्राम : ती आणखी खाण्यासाठी ओरडत राहील.

सुब्रत : (चिडून) मग रात्रभर... हे असंच?

संग्राम : पण ती ओरडायची थांबेल...

सुब्रत : कशी?

संग्राम : तिला सोडून द्यायची.

(संग्राम बाहेर जातो. सुब्रत खिडकीजवळ जाऊन बाहेर बघतो)

लिली : तू पायऱ्या चढू शकला नाहीस.

सुब्रत : (लक्ष नसल्यासारखं बाहेर बघत) आँ

लिली : तू माझ्याबरोबर पायऱ्या चढू शकला नाहीस.

सुब्रत : (तसच बाहेर बघतच) Interesting

लिली : Interesting?

सुब्रत : शेळी उड्या मारीत पायऱ्यांवरून खाली उतरत आहे.

लिली : आणि बिस्किटे ?

सुब्रत : चौकीदार तिच्यामागे धावतोय.

लिली : चौकीदार ?

सुब्रत : इकडे येऊन बघ. काय मजा आहे. चौकीदार धावू शकत नाहीए.

लिली : आणि वर्मासाहेब ?

सुब्रत : तेही चौकीदाराच्या पाठोपाठ...

लिली : तो... ?

सुब्रत : उभा राहून हसतोय.

लिली : (खिडकीजवळ जाते आणि बाहेर बघते) Actor...

(ती जोरजोरात हसते)

सुब्रत : बेबीने बरोबर सांगितलं होतं... Actor...

(सुब्रतही जोरात हसतो. बेबी आत येते)

बेबी : काय झालं ?

सुब्रत : (खिडकीपासून वळत, अजूनही हसतच आहे) Actor...

बेबी : नक्कीच Actor. मी त्याला कॉलेजमध्ये बघितलं होतं.

सुब्रत : (तसंच हसत) कॉलेजमध्ये...

बेबी : तुम्ही त्याला कधी बघितलं नाहीत ?

सुब्रत : नाही.

बेबी : लिली तू ?

लिली : मीसुद्धा नाही.

बेबी : तेच तर सांगते आहे. मी एकटीनेच त्याला बघितलं आहे. (संग्राम येतो)

संग्राम : मी सांगत नव्हतो ती गप्प होईल.

बेबी : ती थोड्या बिस्किटांनीसुद्धा गप्प झाली असती.

संग्राम : अशक्य.

बेबी : शेळी एक पाळीव प्राणी आहे.

संग्राम : नाही.

सुब्रत : नाही ?

संग्राम : शेळी एक पाळीव प्राणी आहे. (वर्मा येतो)

वर्मा : चौकीदारने तिला पकडून आणली आहे.

संग्राम : पुन्हा ती कोकलणार.

वर्मा : मी थोडी बिस्किटं देऊन आलोय.

संग्राम : त्याने ती चूप होणार नाही.

सुब्रत : नाही चूप बसली तर सोडून द्या.

संग्राम : चौकीदार तिला परत पकडेल.

वर्मा : परत सोडून देऊ.

संग्राम : तो परत धरेल

बेबी : (सहन न होऊन) शेळी एक पाळीव प्राणी आहे.

संग्राम : नाही

सुब्रत : नाही?

संग्राम : शेळी एक पाळीव जंगली प्राणी आहे.

वर्मा : (हसत) पाळीव जंगली प्राणी... (लिली उठते आणि डाव्या हातच्या खोलीकडे निघते.)

बेबी : लिली. . . (तिच्या मागोमाग निघते)

वर्मा : ही पण घेऊन जा.

(वर्मा बंदूक बेबीकडे देतो. बेबी ती घेते आणि लिलीच्या पाठोपाठ जाते.)

सुब्रत : (आरामशीरपणे बसत) खूप मजा करूया.

वर्मा : (बसत) आज रात्री शिकार होऊ शकणार नाही.

सुब्रत : काही हरकत नाही. आपण बसून गप्पा मारू या...

वर्मा : (हसत) हो हो. सगळं विसरुया.

सुब्रत : इथे येऊन मी सगळं विसरलो आहे. .

संग्राम : हो हो खूप गप्पा मारुया. . . मी Actor....

वर्मा : Actor: शेळी एक पाळीव प्राणी आहे.

संग्राम : (वर्माला सुधारत) जंगली प्राणी.

सुब्रत : जंगली प्राणी

(त्यानंतर सगळे खो खो करत जोरात हसत सुटले.)

....

अंक दुसरा

(तीच खोली, दुसऱ्या दिवशीची संध्याकाळ एक दिवा मधे टांगला आहे. दिव्याचा प्रकाश खोलीभर पसरला असला तरी उजेड प्रखर नाही आहे. जशी जशी रात्र होत जाते तसा उजेड वाढायला लागतो. खोली प्रकाशमान होत जाते. खोलीचं रूप पालटलेलं. जंगलातून डहाळ्या, पानं वगैरे आणून खोली सजवलेली आहे. आता बेबी एक डाहळी घेऊन नीट लावत आहे. तेवढ्यात उजव्या खोलीतून सुब्रत आत येतो.)

सुब्रत : ॲक्टर अजून आले नाहीत का? (एका खुर्चीत बसतो)

बेबी : नाही.

सुब्रत : मी खूप झोपलो.

बेबी : हं!

सुब्रत : (स्मित हास्य करत) रीलॅक्सड्.

बेबी : रात्री शिकारीला जाणार?

सुब्रत : सवय आहे मला रात्रीच्या जागरणाची.

बेबी : शिकार करणं म्हणजे काही पुस्तक वाचणं नव्हे.

सुब्रत : दार बंद करून?

बेबी : हूं !

सुब्रत : पुस्तक मी आणली नाहीत.

बेबी : बरं झालं मी वाचले.

सुब्रत : (जांभई देत) दुपारचं झोपलं की. . .

बेबी : आळसावल्यासारखं वाटतं.

सुब्रत : नाही नाही. तरतरीत वाटतं.

बेबी : ओ. . .

सुब्रत : तू झोपली नाहीस?

बेबी : जरा खोली सजवत होते.

सुब्रत : (उठून चौफेर नजर टाकत) वा ! सुंदर.

बेबी : (कुत्सितपणे) खरंच?

सुब्रत : खरंच सुंदर.

बेबी : वर्मांनी ह्या डहाळ्या काढून आणल्या होत्या.

सुब्रत : कुठे आहेत ते?

बेबी : स्पॉटवरती.

सुब्रत : लिली?

बेबी : ती झोपली आहे.

सुब्रत : दुपारचं जेवण फार झालं. . . .

बेबी : हं.

सुब्रत : (खिडकीजवळ जात) चौकीदार. . .

बेबी : तो वर्मांच्या बरोबर गेला आहे.

सुब्रत : स्पॉटवर?

बेबी : फांद्या, डाहाळ्या आणि पाने वगैरे घेऊन. . .

सुब्रत : ओह. . . .

बेबी : कशाला माहिती आहे?

सुब्रत : फॉर कॅमोफ्लेज (Comouflage)....

बेबी : शिकारीच्या स्पॉटवर. . . .

सुब्रत : म्हणजे आज नक्की. . .

बेबी : वाघ. . .

सुब्रत : कसं काय-ओळखलंस?

बेबी : चौकीदार सांगत होता.

सुब्रत : गुड. (सुब्रत भिंतीजवळ जाऊन डहाळ्या बघतो.)

बेबी : चहा घेणार?

सुब्रत : (एकदम) पण त्या खोलीतला दिवा लावला तर लिलीची झोपमोड होईल.

बेबी : थोडा वेळ वाट बघू या. (काही वेळ दोघंही गप्प.)

सुब्रत : तू ॲक्टरला केव्हापासून ओळखतेस?

बेबी : सांगितलंन की कॉलेजपासून.

सुब्रत : एकाच वर्गात होतात का?

बेबी : नाही तो वरच्या वर्गात होता.

सुब्रत : अभिनयावरून आता एकदम सोन्याची खाण

बेबी : वेडेपणा.

सुब्रत : वेडेपणा?

बेबी : तेच अभिनयावरून आता सोन्याच्या खाणी.

सुब्रत : ओह. . . . (लिली पडदा सारून डाव्या खोलीतून आत येते.)

लिली : संध्याकाळ झालीच की! (बेबी उठून जायला लागते.)

सुब्रत : कुठे?

बेबी : लाईट (बेबी आत जाते.)

सुब्रत : माझीही मस्त झोप झाली.

लिली : शिकारीला जाणार का रात्री?

सुब्रत : सकाळी वर्मा म्हणत होते.

लिली : मी नाही जाणार. बेबीचं काय?

सुब्रत : मला माहित नाही.

लिली : (डहाळ्या बघून) ह्या सगळ्या तुम्ही?

सुब्रत : नाही नाही. मी नाही बेबीनी लावल्या. (बेबी लाईट लावून आत येते.)

लिली : बेबी जर चौकीदाराची शेळी ह्या इथे शिरली तर. . .

बेबी : (घाबरून) ओ नो. . .

सुब्रत : घाबरू नकोस. ती कशाला इथे येणार आहे?

लिली : हे काही सांगून गेले का?

सुब्रत : कोण वर्मासाहेब?

लिली : हो.

बेबी : ते येतच असतील.

लिली : (डाव्या खोलीत डोकावून बघते) बंदूकही घेऊन गेले नाहीत.

सुब्रत : चौकीदार आहे की बरोबर.

लिली : (उपहासाने हसत) ही पण एक नशा.

सुब्रत : जर त्यांनी वाघ मारला तर त्यांच्या ह्या नशेला काही अर्थ आहे असं मी मानीन.

बेबी : वाघ नक्की मिळेल.

लिली : तुला ग काय माहिती?

बेबी : तसं चौकीदार सांगत होता.

सुब्रत : वाघ येत असेल रात्रीचा.

लिली : अशक्य.

सुब्रत : कसं माहिती?

लिली : काल रात्रभर मी बाहेरच्या व्हरांड्यात बसून होते.

सुब्रत : रात्रभर?

लिली : जर वाघ आला असता तर त्याच्या वासानी शेळी नक्की ओरडली असती.

बेबी : अगदी चूक उलट शेळीच्या वासानी वाघ गुरगुरतो.

सुब्रत : एकूण एकच, पण. . .

लिली : मी का बसले होते हेच न?

सुब्रत : हो का?

लिली : (हळू आवाजात) झोपच आली नाही.

सुब्रत : मीही काल रात्री नीट झोपू शकलो नाही.

बेबी : तुम्ही?

सुब्रत : रात्री खूप उशिरापर्यंत गप्पा मारत बसलो होतो. तो अॅक्टर फारच गंमतशीर माणूस आहे.

बेबी : आपण त्याला चौकीदाराच्या खोलीत झोपू दिलं खरं. पण ते बरोबर नाही झालं.

सुब्रत : मी त्याला खूप म्हणालो होतो.

बेबी : खोटं.

सुब्रत : खोटं नाही. वर्मांनीसुद्धा त्याला सांगितलं होतं.

लिली : ह्यांनीसुद्धा?

सुब्रत : (थट्टेनी) मग तुम्ही सांगायचं होतंत.

लिली : मी? (सुब्रत हे कोणाला म्हणाला होता ते सांगणं कठीण होतं कारण तो दोघींकडे बघून हसत होता.)

बेबी : मी?

लिली : कालच्या काही तासांच्याच ओळखीवर मी. . . .

बेबी : माझी ओळख आहे म्हणा कॉलेजपासूनची पण मी. . .

सुब्रत : जाऊ दे. कालचं काल गेलं. पण आजचं. . .?

लिली : आज !

सुब्रत : वर्मांनी जाताना आवर्जून सांगितलं आहे.

बेबी : वर्मांनी?

सुब्रत : मीही सांगितलंय म्हणा. दिवसभर कितीही वेळ त्याला सोन्याच्या खाणीचा शोध घेऊ दे किंवा बिघडलेली गाडी इथवर आणण्याचा प्रयत्न कर दे. आपण इथे तीनच दिवस रहाणार आहोत तेव्हा रात्री मात्र त्यांनी आपल्याबरोबरच. . .

लिली : गप्पा अगदि सुंदर मारतो.

बेबी : आणि उत्कृष्ट अभिनेता.

सुब्रत : म्हणत तरी होता तसं !

बेबी : काय?

सुब्रत : वेळ मिळाला तर करुन दाखवेल म्हणून. मोनोॲक्टींग (संग्राम गुणगुणत आत येतो.)

संग्राम : शेळी जंगलातली एक पाळीव प्राणी आहे.

सुब्रत : (स्वागत केल्यासारखं) तुम्हाला उशीर झाला.

संग्राम : शेळी जंगलातील एक पाळीव प्राणी हे वाक्य अनेक प्रकारांनी सांगता येईल.

बेबी : म्हणजे?

संग्राम : जंगली शेळी एक पाळीव प्राणी. एक पाळीव प्राणी शेळी जंगलची ! पाळीव प्राणी शेळी जंगलची एक. प्राणी शेळी जंगलाची एक पाळीव. प्राणी पाळीव एक जंगली शेळी. पाळीव एक जंगली शेळी प्राणी. एक जंगली शेळी प्राणी पाळीव. जंगली शेळी प्राणी पाळीव एक. शेळी एक पाळीव जंगली घरेलू प्राणी. वगैरे... वगैरे... वगैरे...

बेबी : (जोरात हसत) ओह ॲक्टर...

संग्राम : ॲक्टर...

सुब्रत : (हसत हसत) यू ॲक्टर...

संग्राम : वर्मा साहेब?

बेबी : ते अजून आले नाहीत.

लिली : ते स्पॉटवर गेले आहेत.

संग्राम : शेळी पळून गेली होती. मी पकडून आणली.

बेबी : हो आता ती ओरडतही नाहीये.

संग्राम : बांधून ठेवली आहे. (लिली डाव्या खोलीकडे जायला लागते.) राहू दे.

लिली : (थांबून) काय?

संग्राम : शेळीला घेऊन येतो.

लिली : ह्या इथे?

सुब्रत : बेबींनी इतकं छान सजवलेल आहे, इथे आणली तर सगळं खाऊन टाकेल.

संग्राम : (टेबलावर ठेवलेला चाकू उचलून धार बघतो.) हू. . .

बेबी : काय?

संग्राम : (हसत) आपण शेळी कापू या.

लिली : (चमकून) शेळी?

संग्राम : वर्मासाहेब येऊ देत.

बेबी : काय म्हणायचंय काय?

संग्राम : रात्री मटणचॉप.

सुब्रत : ॲक्टर. . .

संग्राम : तुम्ही चौघजण चार तंगड्या धरा आणि मी. . .

लिली : नाही.

संग्राम : अगदी धारदार सुरी आहे. (एक डहाळी कापतो) हीही छान कापली गेली.

बेबी : (जोरात ओरडते) नाही.

सुब्रत : ॲक्टरला आज सोन्याच्या खाणीचा शोध लागलेला दिसतोय.

लिली : कशावरून?

सुब्रत : ते इतके खूश आहेत. . .

संग्राम : सोन्याच्या खाणीचा शोध लागला की माणूस खूश होतो का?

सुब्रत : मग?

संग्राम : (थकल्यासारखा एका खुर्चीत बसतो) मला जरा बसू दे.

सुब्रत : खूप फिरावं लागलं का?

संग्राम : खूपच. अगदि दिवसभर. (बाहेरून वर्मा आणि चौकीदार येतात.)

वर्मा : द स्पॉट इज रेडी. . .

सुब्रत : किती दूर?

वर्मा : चौकीदार. . .

चौकीदार : तसं सरळ अंतर फक्त अर्धा मैल आहे पण थोडं टेकडीला वळसा घालून.

वर्मा : म्हणजे साधारण मैलभर.

संग्राम : तुझी शेळी पुन्हा सुटली होती.

चौकीदार : जी

संग्राम : मी पकडून आणली.

चौकीदार : नाही साहेब आता संध्याकाळ झाली आहे तर ती कुठे जायची नाही. तिच्या जागेवर जाऊन बसेल.

संग्राम : (वर्मांना विचारतो) तुम्ही केव्हा निघणार?

वर्मा : चौकीदार. . .?

चौकीदार : थोडी रात्र झाली की जाऊ या.

संग्राम : वाघ का हरिण?

चौकीदार : आता जंगलाची गोष्ट, पण पाणी प्यायला झऱ्यावर हरिण आलं की पाठोपाठ वाघ येतोच.

सुब्रत : कॅमोफ्लेज?

वर्मा : परफेक्ट

सुब्रत : थोडा चहा मिळणार का?

लिली : मिळणार का म्हणजे नक्कीच मिळणार (लिली उठून उजव्या खोलीत जाते.)

बेबी : जेवणही तयार आहे.

सुब्रत : अच्छा. . .

बेबी : दुपारी तुम्ही झोपलात म्हणून मी एकटीनी बसल्या बसल्या.

सुब्रत : बेबीनी ही खोली सजवली.

संग्राम : ओह हाऊ नाईस?

बेबी : आणि रात्रीचा स्वैपाकही मी केला.

वर्मा : मी नाही जेवणार. जेवलं की मला झोप येईल.

सुब्रत : एक कप चहा घ्या म्हणजे झोप उडून जाईल.

वर्मा : नको आता चहासुद्धा नको. चौकीदार. . .

चकीदार : जी साहेब.

वर्मा : तू जा आणि जेवून घे.

चौकीदार : हो साहेब.

वर्मा : बेबी. . .

बेबी : चल रे (पुढे बेबी आणि मागोमाग चौकीदार उजव्या खोलीत जातात.)

वर्मा : बेबीताई खूप गप्प गप्प असतात.

सुब्रत : खूपच.

संग्राम : गप्प असते?

वर्मा : पण लिली. . .

सुब्रत : तिचं काय?

वर्मा : काल रात्री. . .

संग्राम : झोपल्या नाहीत.

सुब्रत : तुम्हाला कसं समजलं?

संग्राम : एक अंदाज

वर्मा : ओह...

सुब्रत : आणि तुमचं?

वर्मा : गादीवर पडल्यापडल्या मी घोरायला लागलो. तुझं काय?

सुब्रत : मला रात्री उशिरापर्यंत वाचायची सवय आहे.

वर्मा : मग काल रात्री?

संग्राम : काल रात्री तेही नीट झोपले नाहीत.

वर्मा : हे कसं ओळखलं.

संग्राम : हाही एक अंदाजच.

वर्मा : वुई आर सॉरी,

संग्राम : का?

सुब्रत : तुम्ही, चौकीदाराच्या खोलीत...

संग्राम : मला काही त्रास झाला नाही

वर्मा : पण. . . .

संग्राम : (एकदम विषय बदलून) तुम्ही म्हणत होतात गोष्ट ऐकायची आहे म्हणून?

वर्मा : गोष्ट?

संग्राम : हो, एकदा एका सद्गृहस्थानी अंधारात रहायचं ठरवलं.

वर्मा : अंधारात?

संग्राम : डोंगरात एक गुहा शोधून त्यात जाऊन राहिले.

सुब्रत : Absurd.

संग्राम : तिथे ते खूप दिवस राहिले. . . . अनुभव.

वर्मा : खाण्यापिण्याचं काय?

संग्राम : उपास. . . . भूक. . . . प्लेझर. . .

सुब्रत : फालतू गोष्ट. (सुब्रत उठतो. तेव्हाढ्यात लिली चहा घेऊन येते. सगळ्यांना देते. चहा पिता पिता).

वर्मा : (संग्रामला) आज किती दूर जाऊन आलात?

संग्राम : खूप लांबवर.

सुब्रत : गाडी?

संग्राम : तशीच पडली आहे.

सुब्रत : ओह !

वर्मा : उद्या परत. . .

संग्राम : दुसरा डोंगर.

लिली : साखर?

संग्राम : नको (बेबी येते.)

बेबी : चौकीदार जेवतो आहे. (बोलणी चालूच असतात.)

सुब्रत : समजा तुम्हाला सोन्याची खाण मिळाली, तर काय करणार?

संग्राम : (हसत हसत) सोन्याच्या सगळ्या खाणी सरकारच्या.

वर्मा : Strange, मग तुमचा फायदा काय?

संग्राम : इतका फिरतोय. कष्ट घेतोय?

सुब्रत : हो, पण का?

संग्राम : कॉलेजमध्ये मला नाटकाचं वेड होतं. पण अभिनयानी मला खूप प्रसिद्धी मिळाली नसती, म्हणून विचार केला की काहीतरी असामान्य करावं...

वर्मा : सोन्याची खाण.

संग्राम : होय, खाणी मला नावलौकिक मिळवून देतील.

वर्मा : नाटकात काम करणं बंद केलं का?

सुब्रत : पण कालतर म्हणत होतात Monoacting कराल म्हणून?

संग्राम : इथे ते शक्य आहे का?

वर्मा : पण इथे स्टेज कुठे आहे?

संग्राम : Oh, no, Life is a stage, पण. . .

वर्मा : आपल्याला वेळ तर घालवायला हवा.

सुब्रत : माझे जीवनही एक स्टेज आहे.

लिली : वर्गात स्टेजवर उभे राहूनच तुम्ही मुलांना शिकवता.

बेबी : स्टेज नव्हे, platform.

संग्राम : Platform वर पुढारी उभे राहतात आणि भाषण ठोकतात.

सुब्रत : माझ्या वडीलांची मी राजकारणात जावं अशी इच्छा होती.

बेबी : ते तुम्हाला जमलं नसतं.

सुब्रत : तुला कसं काय माहित?

लिली : तुम्ही राजकारणात का गेला नाहीत?

सुब्रत : विचार केला शिक्षण पूर्ण करून प्रथम ज्ञान प्राप्त करू या.

वर्मा : (हसत) from Politics to Philosophy?

सुब्रत : फिलॉसॉफी सोपी आहे.

लिली : राजकारणात गेला असतात तर ह्यांच्यासारखं सतत फिरावं लागलं असतं.

वर्मा : माणूस जितका जास्त फिरतो तितका पैसा जास्त कमावतो.

संग्राम : मीही फिरतोय. सोन्याची खाण मिळू शकते, पण सगळ्या खाणी सरकारच्या.

बेबी : पण तुमचं नाव तर होईल?

वर्मा : लहानपणी मी हुशार होतो.

सुब्रत : वर्मा?

वर्मा : हुशार नव्हतो? तुला आठवत नाही, मी वर्गात नेहेमी पहिला यायचो.

सुब्रत : पहिला. . .

वर्मा : मी चांगला खेळतही असे.

संग्राम : Football?

वर्मा : सगळेच खेळ. A good sportsman.

लिली : स्पोर्टस्‌मन इतका झोपत नाही आणि उपाशीपोटी फिरतही नाही. . .

वर्मा : रात्रभर जागायचं म्हणून मी जेवत नाही.

संग्राम : मी दिवसभर फिरत होतो.

वर्मा : आमच्या विनंतीला मान देवून परत आलात त्याबद्दल. . .

संग्राम : आभारी आहोत, असंच न?

सुब्रत : नाही, आनंद झाला

संग्राम : न येण्याचा विचार होता.

लिली : का?

संग्राम : ओळख नसताना असं येणं.

वर्मा : ती झाली कालची गोष्ट पण आज आपण एकमेकांना चागले ओळखतो.

संग्राम : मित्र.

वर्मा : नक्कीच मित्र

संग्राम : आपण किती वेळ गप्पा मारत बसणार?

वर्मा : म्हणजे?

सुब्रत : तुम्हाला भूक लागली आहे का? जेवणार का?

संग्राम : दिवसभर इतका फिरलो आहे.

बेबी : मग तुम्ही चहा का प्यायलात?

संग्राम : मी प्यायलो नसतो तर. . . .

वर्मा : (उठत) लिली. . .

लिली : मी इथेच आणू का?

वर्मा : (डाव्या खोलीकडे जाता जाता) तुमचं चालू दे. . . मी जरा dress घालून

येतो. (वर्मा खोलीत जातो.)

लिली : मग मी वाढून आणते. (लिली उजव्या खोलीत जाते.)

संग्राम : तर मी काही आता इथे पाहुणा नाही.

सुब्रत : (हसत) वर्मा म्हणाले की, मित्र म्हणून.

संग्राम : मित्र तर. . . मग मलाही मदत करू देत. (म्हणत लिलीच्या पाठोपाठ उजव्या खोलीत जातो.)

सुब्रत : शिकारीला तू आमच्याबरोबर येणार का?

बेबी : अ हं! मी दुपारी जरासुद्धा पडले नव्हते.

सुब्रत : म्हणजे मी झोपलो होतो म्हणून. . . (बेबी जेवणासाठी टेबल लावायला लागते.)

बेबी : खोटं बोललात.

सुब्रत : कशाबद्दल?

बेबी : राजकारणाबद्दल.

सुब्रत : नाही, ते खरं आहे.

बेबी : नाही साफ खोटं आहे. तुमच्या वडिलांची कधीही इच्छा नव्हती की तुम्ही राजकारणात शिरावं म्हणून.

सुब्रत : पण वर्मा तर सांगत होता, तो वर्गात पहिला यायचा म्हणून.

बेबी : Strange.

सुब्रत : Absurd. तो तर नापास व्हायचा.

बेबी : पण ते Sportsman होते.

सुब्रत : मीही चांगला खेळायचो.

बेबी : आणखीन एक खोटं.

सुब्रत : तुला काय माहित?

बेबी : पुस्तकातला किडा,

सुब्रत : बेबी !

बेबी : हो आहेसंच Bookworm

सुब्रत : बेबी !!

बेबी : स्टडीरुमचं दार बंद करून, पुस्तकात डोकं खुपसून Bookworm नेहमीच. . . अगदी लहानपणापासून.

सुब्रत : आज. . . आजही (बेबीच्या जवळ जातो आणि आवेगानी तिला जवळ ओढत तिच्या कानाशी बेबी. . . बेबी. . .

बेबी : (स्वत:ला सोडवू बघते) ते बाजूच्याचं खोलीत. . .

सुब्रत : (न सोडता) म्हण. परत म्हण Bookworm.

बेबी : (कुजबूजल्यासारखं) वर्मा - लिली. . . Actor . . . सगळे त्या खोलीत.

सुब्रत : काल रात्री मी झोपू शकलो नाही.

बेबी : सोडा मला.

सुब्रत : नाही. . . आधी मला उत्तर दे. मी काय पुस्तकातला किडा आहे?

बेबी : (सुब्रतच्या चेहऱ्याकडे टक लावून बघते.) हो.

सुब्रत : (जोरत) नाही !

वर्मा : (डाव्या खोलीतून) सुब्रत... माझा बेल्ट - Please.

(सुब्रत शॉक लागल्यासारखा बाजूला होऊन बेबीला सोडतो व डाव्या खोलीकडे जायला लागतो.)

सुब्रत : बेल्ट...?

बेबी : बेल्ट कमरेवर आवळून देण्यासाठी ते बोलावत आहेत.

वर्मा : (आतून बोलावतो) सुब्रत. . . (सुब्रत काही न बोलता त्या खोलीत जातो. बेबी परत टेबल लावायला लागते. वड्यांनी भरलेली Plate घेऊन संग्राम येतो.)

संग्राम : (Plate ठेवता ठेवता) अगदी मस्त झालेत. (बेबी आश्चर्यानी बघते म्हणून) मी खाऊन बघितलेत.

बेबी : लिली?

संग्राम : पोळ्या करते आहे.

बेबी : बोलणं झालं?

संग्राम : नाही.

(बेबी मुकाट्याने लाकडी बॉक्समधून Plate काढून टेबलावर मांडायला लागते.)

संग्राम : का माहिती आहे?

बेबी : का?

संग्राम : मला सेफ वाटत नाही.

बेबी : म्हणजे?

संग्राम : मी एकटा आहे मि. वर्मांना उगाचच संशय येईल.

बेबी : आणि सुब्रतला माझा?

संग्राम : नाही.

बेबी : कशावरून

संग्राम : सुब्रतला माहीत आहे आपली ओळख आहे. (काही वेळ शांतता)

बेबी : तू खरंच सोन्याच्या खाणीच्या शोधात आहेस?

संग्राम : हेच तू मला काल ही विचारल होतस?

बेबी : माझा विश्वास नाही.

संग्राम : तू मागे एकदा माझ्याबरोबर ह्या डाक-बंगल्यात आली होतीस.

बेबी : (आर्त स्वरात ओरडले) संग्राम

संग्राम : अभिनय . . .?

बेबी : शिकारीला जाणार आहेस?

संग्राम : नाही.

बेबी : दिवसभर खूप फिरला आहेस म्हणून

संग्राम : दमलो आहे. . .

बेबी : जेवून लगेच झोपणार?

संग्राम : आणखी काय करणार?

बेबी : चौकीदाराच्या खोलीत? (लिली पोळ्या घेऊन येते)

लिली : मी सगळं अन्न गरम केलय.

संग्राम : (जोरात हाक मारतो) वर्मा साहेब!

वर्मा : (खोलीमधूनच) मी Dress घालतोय.

संग्राम : Professor. . . .

सुब्रत : (त्याच खोलीतून) मी वर्मांना मदत करतो आहे.

बेबी : (जरा मोठ्या आवाजात) पोळ्या गार होतील.

संग्राम : (जोरात) नाही. नाही. (बेबीकडे बघून) खूपच भूक लागली आहे.

बेबी : खोटं.

संग्राम : खोटं?

बेबी : मग काय खरं?

लिली : हो खरं. . . (सुब्रत येतो.)

सुब्रत : चला आपण सुरवात करु या. वर्मा तर जेवणार नाही आहे. (सगळे बसतात.)

संग्राम : वडे एकदम टॉप

सुब्रत : कस कळलं?

संग्राम : मी आधीच चव घेतली होती. (सुब्रात जोरजोरात हसतो व जेवायला सुरुवात करतो.)

लिली : कसे झालेत?

सुब्रत : उत्तम.

लिली : बेबी Compliments

सुब्रत : दुपारी मी झोपलो होतो तेव्हा बेबीनी. . .

लिली : मी पण झोपले होते.

संग्राम : आणि मी दुपारी पलिकडच्या डोंगरावर Graph ऑपरेट करत होतो.

लिली : Graph?

संग्राम : Gold-detector. (वर्मा शिकाऱ्याच्या पोशाखात आत येतो.)

वर्मा : कसा काय दिसतो आहे?

संग्राम : शिकारीचा Dress?

वर्मा : हो! पण बेल्ट फारच घट्ट वाटतोय.

लिली : नवीन आहे म्हणून.

संग्राम : (वर्मा जवळ जात) मस्त फीट बसतोय.

सुब्रत : मी फीट केलाय.

बेबी : Sportsman.

संग्राम : (जोरात हसत) अच्छा. . .

सुब्रत : नाही, त्याचा बेल्ट मी फीट केलाय.

वर्मा : मला नीट जमल नाही.

सुब्रत : पण मला जमलं.

वर्मा : त्यासाठी जोर लावावा लागतो.

सुब्रत : जोर नाही कौशल्य.

वर्मा : कौशल्य वाघाच्या शिकारीसाठी लागतं.

संग्राम : कौशल्य. . . का एकाग्रता?

बेबी : एकाग्रता . . . का साहस?

लिली : साहस . . . का नेम?

वर्मा : नाही कौशल्यच.

बेबी : (सुब्रतला) तुम्ही चांगली शिकार करू शकाल.

सुब्रत : (चमकून) मी?

संग्राम : प्रयत्न केला तर काहीही अशक्य नाही.

बेबी : शिकार करण म्हणजे अभिनय नव्हें.

संग्राम : मी अभिनय सोडलाय.

सुब्रत : पण तुम्ही Monoacting दाखविन म्हणाला होतात.

संग्राम : आत्ता?

सुब्रत : जेवण झाल्यावर

वर्मा : नको, आज नको, उद्या बघू या.

संग्राम : उद्या मी इथेच. . .

बेबी : सोन्याच्या खाणी काय कुठे पळून जात आहेत?

वर्मा : आजच शिकारीच तर होऊ दे

संग्राम : उद्या तुम्ही माझ्याबरोबर याल का?

वर्मा : कुठे?

संग्राम : सोन्याच्या खाणीच्या शोधात.

वर्मा : कल्पना काही वाईट नाही. (जेवण संपतं बेबी Plates उचलायला लागते)

बेबी : Really good idea

सुब्रत : नाही, उद्या दिवसभर आपण गप्पा मारू या.

वर्मा : गप्पा? अशा किती आणि काय गप्पा मारणार?

सुब्रत : यांचा अभिनय बघू या.

संग्राम : माझा

बेबी : दिवसभर . . . ?

सुब्रत : रात्रीही बघू या.

बेबी : आज. . .

संग्रम : आज शिकार

लिली : जर का वाघ नाही मिळाला तर?

संग्राम : हरीण मिळेल.

वर्मा : चौकीदार सांगत होता तिथे हरणं येतात.

लिली : आज हरिण मारून आणलंत तर उद्या मी शिजवीन.

सुब्रत : हरणाच्या आणि शेळीच्या मांसात फरक असतो.

लिली : ते तुम्ही कसं बनवता त्यावर असत. (सुब्रत उठतो आणि पोटावरून हात फिरवतो.)

सुब्रत : Heavy (वर्मा सुब्रतच्या पोटावर हात फिरवतो.)

वर्मा : Heavy

लिली : जास्त खाल्ल की झोप येते.

वर्मा : तू माझ्या शेजारी बस, मी तूला उठवेन.

संग्राम : पण ते परत झोपून जातील.

सुब्रत : शक्यता नाकारता येणार नाही.

लिली : होय, अशक्य नाही.

बेबी : ते दुपारभर झोपले आहेत.

सुब्रत : मग मी रात्रभर झोपणार नाही.

(आता सगळ्यांचं आटपलेलं असंत संभाषण चालू असताना लिली व बेबी टेबलावरच्या बाकीच्या जीनसा घेऊन एका पाठोपाठ शेजारच्या खोलीत शिरतात.)

संग्राम : जेवण अतिशय सुंदर होतं.

वर्मा : बेबीताईंच्या हाताला चव आहे.

सुब्रत : न जेवताच प्रशस्तीपत्रक?

वर्मा : मी याआधी त्यांच्या हातचे जेवलो आहे.

सुब्रत : लिलीसूद्धा चांगला स्वयंपाक करते.

संग्राम : एकूण सगळ्या बायका चांगला स्वयंपाक करतात.

वर्मा : नाही, सगळ्या नव्हे, त्यातल्या काहीजणीच

संग्राम : ज्यांना चांगला स्वयंपाक येतो त्यांचे नवरे भाग्यवान.

सुब्रत : नवरे?

संग्राम : हो, नवरे!

वर्मा : तुमची बायको नाही का करत चांगला स्वयंपाक?

संग्राम : मला बायकोच नाही.

वर्मा : म्हणजे. . . अजूनपर्यंत तुमचं. . . लग्न? (बेबी येते संग्राम तिच्याकडे बघून)

संग्राम : नाही.

सुब्रत : ओह.

वर्मा : (हसत) वय निघून गेलं आहे.

संग्राम : सोन्यांची खाण शोधणं. . .

वर्मा : सोन्याची खाण शोधत बसलात तर बायको मिळणार नाही.

संग्राम : मग नाटकात कामं केली तर?

सुब्रत : Oh. actor. . . (लिली आत येते. संग्राम तिच्याकडे बघत)

संग्राम : सगळेच Actor

सुब्रत : थियरी (Theory). . .?

संग्राम : तुम्ही नाही आहात?

सुब्रत : absurd

संग्राम : आणि तुम्ही?

वर्मा : मी आणि Acting? Heavens. . .

संग्राम : (बेबी कडे बघून) आणि तुम्ही?

बेबी : मी? नाही. . . हो अर्थात मी Acting खूप बघितलंय (संग्राम उत्तरासाठी लिलीकडे बघतो)

लिली : (उपहासानी) A. . . c. . . t. . . i. . . n. . . g.

संग्राम : म्हणजे नाहीच, हो न?

लिली : नाहीच

संग्राम : म्हणजे तुमच्यापैकी कोणी नाही?

वर्मा : आपल्यापैकी कोणी नाही.

सुब्रत : एकाला सोडून

संग्राम : मला?

बेबी : हो. (चौकीदार येतो. सगळे त्याच्याकडे असे बघतात जसं त्याचं यावेळी येणं कोणालाच नको असतं)

लिली : काय रे?

चौकीदार : एखादी पोळी असली तर. . . ती शेळी. . . कितीही खायला दिलं तरी तिचं पोट भरत नाही जर काही उरल असल तर!

सुब्रत : काही उरलंय का?

बेबी : खूप आहे (बेबी उजव्या खोलीत जाते.)

वर्मा : निघू या?

चौकीदार : अजून थोडी रात्र झाली की निघूया. आत्ता पासून गेलं की बसून बसून पाठ कंबर दुखेल आणि कंटाळवाणं होईल. साहेब आपण आत्तापासून हा पोशाख घालून. . . (बेबी येऊन चौकीदाराच्या हातात पोळ्या देते.) निघायची वेळ झाली की मी येईन (चौकीदार जातो.)

वर्मा : (अस्वस्थ होऊन) छे! उगीचच?

सुब्रत : काय?

वर्मा : (बसून) आता वेळ काढावा लागणार.

लिली : (सहानुभूति दाखवत) Boring. . .

वर्मा : Boring. . .

संग्राम : गोष्ट सांगू का!

सुब्रत : नको, Acting.

वर्मा : गोष्ट Interesting आहे का?

संग्राम : हो, आहे.

वर्मा : मग नको सत्यकथा असणार.

बेबी : शिकार कथा तर नाही?

संग्राम : अंह. . . सत्यकथा.

वर्मा : शिकारकथाही खरीचगोष्ट असते.

संग्राम : इतर गोष्टीही सत्यकथा असतात.

सुब्रत : गोष्ट नको. Acting.

वर्मा : नाही, गोष्टच! (संग्राम उभा राहून गोष्ट सांगायला लागतो.)

संग्राम : एकदा एका सद्‌गृहस्थानी ठरवलं. . .

सुब्रत : अंधारात. . .

वर्मा : डोंगरातल्या गुहेत. . .

संग्राम : चूक. . . एका डाकबंगल्यात. . .

लिली : (चमकते) डाक बंगल्यात.

संग्राम : जंगल आणि डोंगरानी वेढलेल्या परिसरात असलेल्या अेका डाक बंगल्यात.

वर्मा : सुंदर. . .

सुब्रत : Really. . .

संग्राम : डाक बंगल्यात येऊन त्यांनी बघितल. . . (लिलीकडे बघतो आणि एकदम गप्प होतो)

लिली : काय?

संग्राम : सांगा बरं काय बघितलं असेल?

सुब्रत : मला नाही सांगता येणार

संग्राम : तुम्ही?

वर्मा : वाघ.

संग्राम : नाही.

बेबी : हरीण

संग्राम : नाही.

लिली : मग शेळी? (सगळेजण खो खो हसतात)

संग्राम : नाही, एक बाई. (सगळे गंभीर होतात.)

सुब्रत : बाई?

वर्मा : बाई?

संग्राम : एकटी

सुब्रत : पिकनीकसाठी. . .

संग्राम : त्यासाठी कोणी एकटं येत नाही.

वर्मा : नक्की कोणी फॉरेस्ट ऑफीसर. . .

बेबी : फॉरेस्ट ऑफीसर?

वर्मा : नवऱ्याबरोबर टूरवर आली असेल.

संग्राम : मी विचारले नव्हते.

सुब्रत : पण पुढे काय?

संग्राम : एकटी बाहेरच्या व्हरांड्यात बसली होती.

वर्मा : नक्की ती आकाशात बघून तारे मोजत असणार!

लिली : तारे?

संग्राम : नाही.

सुब्रत : म्हणजे रात्र नव्हती.

संग्राम : अगदी भरदुपार

सुब्रत : मग ती नक्की आवारातली झाडं मोजत असेल.

बेबी : नाहीतर डोंगराचे सुळके. . .

संग्राम : कोणीही सांगू शकला नाहीत.

लिली : मग?

संग्राम : (सगळ्यांकडे पाठ फिरवून) ती बोट चोखत बसली होती.

सुब्रत : Funny.

संग्राम : (वळून) हो स्वत:चंच बोट.

वर्मा : स्वत:चं बोट. (तो स्वत:च बोट चोखून बघतो.)

संग्राम : मला वाटलं बोट कापलं असेल. . .

बेबी : कापलेलं बोट?

संग्राम : तसंही नव्हतं.

सुब्रत : Strange.

वर्मा : (तसच बोट चोखत) मला तर काही जाणवत नाहीये.

संग्राम : स्वत:चच बोट चोखलं तर नाहीच होणार.

सुब्रत : (अधिरपणानी) मग?

संग्राम : (स्वप्नाळू आवाजात) मग तिनी एकदम माझा हात धरला आणि मग माझं बोट. . . (वर्मानी आपल्या तोंडातून बोट काढून लिली समोर केले)

वर्मा : बघ. . .

लिली : शी!

सुब्रत : बेबी. . .

बेबी : शी! (संग्राम हसत बसतो.)

सुब्रत : Please

संग्राम : मी शहारलो, अंगभर झिणझिण्या उठल्या.

सुब्रत : Please (बेबी सुब्रतपासून दूर गेलेली असते. म्हणून सुब्रत उठून तिच्यामागोमाग जाऊन तिचा हात धरतो. आणि तिचं बोट चोखायला लागतो.)

बेबी : (हे सर्व असह्य होऊन) उह. . . उह. . . (मोठ्या कष्टानी स्वत:ला सोडवून घेते आणि उजव्या खोलीत जाते.)

वर्मा : लिली

लिली : (चिडून) नाही. (लिली सुद्धा बेबीच्या पाठोपाठ जाते.)

वर्मा : Sensation. . .?

संग्राम : त्यानंतर. . .

वर्मा : तिचं बोट. . .

संग्राम : हो.

सुब्रत : दोघंही एकमेकांची. . .

संग्राम : हो दोघंही. . . एक नवीन अनुभूती

सुब्रत : Lucky.

वर्मा : सुब्रत!

सुब्रत : नवरा तिचा बाहेर गेला असणार. . . पण बाई

सुब्रत : नक्कीच Sexy असली पाहिजे.

वर्मा : अगदी अविश्वसनिय.

संग्राम : पण ते खरं आहे.

सुब्रत : म्हणून तर म्हणालो, Lucky.

संग्राम : नाही.

सुब्रत : नंतर काय झालं?

संग्राम : मी निघून आलो.

सुब्रत : मित्रा. . . Coward. . .

संग्राम : दुसरा काही उपायच नव्हता.

सुब्रत : खरंच Coward.

संग्राम : मी आहे Actor. (बेबी आत येते.)

बेबी : संपली का नाही गोष्ट!

संग्राम : अजून नाही.

वर्मा : जाऊ दे ही गोष्ट.

संग्राम : ठीक आहे.

सुब्रत : पण का?

संग्राम : आवडली नाही.

बेबी : (जाता जाता दाराजवळ थांबून) अगदी घाणेरडी गोष्ट.

संग्राम : ठीक आहे, नाही सांगत.

सुब्रत : मग सुरवात तरी का केली?

संग्राम : तुम्हीच म्हणालात True Story. . .

वर्मा : Yes True Story. . . Interesting.

सुब्रत : ही सुद्धा true स्टोरीच आणि interesting ही. एकमेकांची बोट. . . (ह्याच वेळी शेळी ओरडते आणि लिली आत येते.)

लिली : बापरे! पुन्हा ती शेळी.

संग्राम : खादाड आहे.

वर्मा : आणखी थोड्या पोळ्या दिल्या. . . (चौकीदार कुऱ्हाड घेऊन येतो.)

चौकीदार : साहेब·शेळी ओरडायला लागली.

बेबी : (चिडून) ते आम्हाला ऐकू येतंय.

चौकीदार : तसं नाही, नीट लक्ष देऊन ऐका साहेब. (सगळे ऐकण्याचा प्रयत्न करतात.) पक्ष्यांचा कलकलाट आणि दुरूनमाकडे, ओरडण्याचा आवाज येतो आहे बघा साहेब.

सुब्रत : अरे खरंच. . .

चौकीदार : तो आवाज ऐकुन शेळी खाण्यासाठी नव्हे तर भीतीनी. . .

लिली : भीतीनी. . .?

चौकीदार : जनावर उतरलंय, चला लवकर निघूया.

वर्मा : लिली, माझी बंदूक (लिली डाव्या घरात जाते वर्मा सुब्रतला म्हणतो) हं चला उठा.

सुब्रत : जेवणं फार झालय मला बर वाटतं नाही आहे

वर्मा : नाही, ते काही चालणार नाही.

सुब्रत : Actor?

संग्राम : मी खूप दमलो आहे.

सुब्रत : आणि माझं पोट. . .

वर्मा : पण!

सुब्रत : चला मग, सगळेच जाऊ या.

वर्मा : सगळे?

सुब्रत : हो! आपण सगळे.

वर्मा : चौकीदार सगळ्यांना जागा होईल का?

चौकीदार : तुम्हीच तर सांगीतलं होतंत, मचाणावर तिघांची सोय कर म्हणून. . .

वर्मा : तिघेजण. . .

सुब्रत : चौघांसाठी नाही का होऊ शकणार?

वर्मा : Camouflage छोट्या जागेत केलं आहे.

संग्राम : मी सुटलो. (बंदूक घेऊन लिली येते, वर्मा ती घेतो.)

सुब्रत : मी सुटलो.

लिली : (अधिरपणे) काय झालं?

सुब्रत : तिथे फक्त तिघांसाठी जागा आहे मचाणावर,

वर्मा : तुमच्यापैकी एकाला थांबावं लागणार.

संग्राम : मी तर दमलो आहे (सुब्रतला) तुम्ही जाऊ शकता. (शेळी पुन्हा ओरडते.)

चौकीदार : साहेब

वर्मा : हो चल निघूया.

बेबी : छान मजा येईल. मग कोण जातंय?

वर्मा : लौकर ठरवा.

सुब्रत : (अनिच्छेनी). . . मी. . .

संग्राम : मी खरंच दमलो आहे.

सुब्रत : पुन्हा अभिनय. . .?

संग्राम : नाही, खरंच.

बेबी : स्टेलमेट.

(वर्मा एकदम खिशातून नाणं काढतो आणि पुढे धरतो.)

वर्मा : टॉस

सुब्रत : टॉस?

वर्मा : हो, त्यावरच ठरवू या.

संग्राम : सुब्रत?

सुब्रत : Head

संग्राम : साहजिकच मी tail

(वर्मा टॉस करतो. सुब्रत. संग्राम चौकीदार सोडून सगळे बघायला खाली वाकतात. आणि एकदम ओरडतात.)

वर्मा : लिली } Head.

बेबी : लिली } Head.

सुब्रत : ओह.

वर्मा : (सुब्रतला) चल चल लवकर.

संग्राम : मी वाचलो.

सुब्रत : (चिडून) काय?

संग्राम : वाघ. . .

वर्मा : (बंदूक सुब्रतच्या हातात देत) नक्कीच वाघ.

लिली : नाही नाही वाघ नाही, हरिण जाऊन आणा.

बेबी : हरीण?

लिली : हो, मी उद्या शिजवीन.

वर्मा : माझा टॉर्च. . .

लिली : Oh, sorry

(लिली उजव्या खोलीत आणायला जाते.)

संग्राम : चौकीदार. . . तुझी खोली. . .

चौकीदार : साहेब, मी बाहेरून नुसती कडी घातली आहे.

संग्राम : ठीक, ठीक आहे.

चौकीदार : खोली मी झाडून ठेवली आहे. कालच्यासारख तुम्ही कॉटवर. . .

संग्राम : ठीक आहे. (जायला लागतो)

सुब्रत : जर आपल्याला शिकार नाही मिळाली तर. . .

वर्मा : आपण उद्या परत जाऊ या.

संग्राम : (थांबून) उद्या मी येईन.

सुब्रत : मीही येऊ शकतो.

(लिली टॉर्च आणून वर्माला देते.)

वर्मा : चौकीदार तू पुढे हो.

संग्राम : Good Luck. . .

बेबी : (निरोपादाखल हात दाखवत) नक्की वाघ मारा हं!

लिली : नाही हरीण.

संग्राम : Good Luck.

वर्मा : Thank You.

सुब्रत : Thank You.

(वर्मा, सुब्रत आणि चौकीदार बाहेर जातात. काही वेळ सगळ शांत संग्राम त्यांना खिडकीतून बघत असतो. मग मागे वळून. . .)

संग्राम : कोणी हरकत घेतली नाही.

बेबी : कशाबद्दल?

संग्राम : मी एकटा राहिलो म्हणून.

बेबी : शी....

(थोडा वेळ तसाच जातो)

लिली : यापूर्वी सुब्रत कधी शिकारीला गेला होता का?

बेबी : नाही.

लिली : तिथे बसून राहणं फार त्रासदायक.

संग्राम : पण एकदा शिकार हातात आली की सगळा त्रास विसरायला होतं.

बेबी : सुब्रत दिवसभर झोपले होते.

लिली : विश्रांतीसाठी ही जागा अगदी योग्य आहे.

(संग्राम एकदम उठून संदूकीवरची सुरी उचलतो.)

संग्राम : ते चाकू इथेच विसरून गेले.

लिली : चाकू त्यांच्या बेल्टमध्ये आहे.

बेबी : ही तर भाजी कापायची सुरी आहे.

लिली : ह्याच सुरीने डहाळ्या कापल्यास का?

बेबी : हो. त्यानेच कापल्या.

संग्राम : चांगलीच धारदार आहे.

(संग्राम सुरीची धार बघण्याकरता त्यावर बोट फिरवतो.)

बेबी : कापेल. जरा सांभाळून.

संग्राम : (सुरी जाग्यावर ठेवत) नाही माझं लक्ष आहे.

बेबी : मला वाटतं तिथे गोळी झाडली तर इथे आवाज येईल.

संग्राम : रात्री अगदी दूर आवाज ऐकू येतो.

बेबी : मी झोपून गेले असेन.

संग्राम : मीसुद्धा.

बेबी : तू दिवसभर वणवण केली आहेस.

संग्राम : हो, मी खूप दमलो आहे.

बेबी : मी दिवसभर थोडीसुद्धा झोपले नाही.

लिली : माझी छान झोप झाली आहे

बेबी : बंदूकीचा आवाज आला तर मला उठव बरं.

संग्राम : मला उठवण्याची काही गरज पडणार नाही.

बेबी : म्हणजे काय?

संग्राम : माझी झोप खूप सावध आहे.

लिली : आतापर्यंत ते सगळे पोचले असतील.

संग्राम : नाही.

बेबी : कशावरून?

संग्राम : एक अंदाज...

बेबी : म्हणाला होतास अभिनय करून दाखवणार आहेस.

संग्राम : बघू या. मूड लागला तर.

लिली : पण कसला अभिनय?

संग्राम : मोनो ॲक्टींग.... एकपात्री अभिनय

लिली : बाहेर बसू या?

बेबी : बाहेर?

लिली : जरा वाऱ्यावर.

संग्राम : मी चाललो झोपायला.

लिली : मी बेबीला विचारलं होतं.

संग्राम : बाहेर उघड्यावर बसणं बरोबर नाही.

लिली : का?

संग्राम : ते इतकं सुरक्षित नाही.

(तो दरवाज्यातून बाहेर जायला लागतो.)

बेबी : हो, खरंच सुरक्षित नाही.

संग्राम : (दरवाज्यापाशी थांबून) दरवाजा आतून बंद करून घ्या.

लिली : (डाव्या खोलीकडे बोट दाखवत) ह्या खोलीचं दार.

संग्राम : त्या खोलीचं नव्हे हा दरवाजा.

(संग्राम दार आपल्यामागे ओढून घेतो. बेबी आतून बंद करते. लिली थोड्या नाराजीनी.)

लिली : शिकार न करता सगळे परत आले तर!

बेबी : ते हाक मारतील.

लिली : जर आपल्याला गाढ झोप लागली असली तर.

बेबी : ते जोरात हाक मारतील.

लिली : शिवाय तू तर दिवसभर झोपली नाहीस.

बेबी : पण तू तर झोपली आहेस.

लिली : पण मला झोप लागू शकते.

बेबी : (जरा ओरडूनच) नाही.

लिली : का नाही?

बेबी : मग आली झोप तर खुशाल झोपून जा.

लिली : मी नाही झोपू शकणार.

बेबी : आता तर म्हणत होतीस झोप लागेल म्हणून.

लिली : म्हणत होते बाहेर बसून गप्पा मारू या.

बेबी : मला बरं वाटत नाही आहे.

लिली : मलाही.

बेबी : का, तुला काय झालं?

लिली : आणि तुला?

बेबी : लवकर झोपायची माझी सवय आहे.

लिली : वर्मा म्हणतात मी फार जाड झाली आहे.

बेबी : लठ्ठ?

लिली : मी कमी नाही होऊ शकणार?

बेबी : हो ऽ ऽ ऽ

लिली : कशी?

बेबी : रोज व्यायाम कर.

लिली : ह्या वयात?

बेबी : मग नाटकात काम कर.

लिली : नाटकात?

बेबी : हो. मोनोअॅक्टींग.

लिली : मी आणि अॅक्टिंग.

बेबी : अॅक्टर आहेच की शिकवायला.

(बेबी उजव्या खोलीकडे जायला लागते)

लिली : काय म्हणायचंय तुला?

बेबी : तेच अॅक्टींग मोनोअॅक्टींग, व्यायाम...

(बेबी उजव्या खोलीत जाऊन लाईट घालवते आणि दरवाजा बंद करून घेते. लिली बडबडत असते.)

लिली : व्यायाम... अॅक्टींग....

(बाहेरच्या दरवाज्यावर हलकी थाप पडते. लिली दरवाजा उघडते. संग्राम आत येतो)

लिली : काय झालं?

संग्राम : ॲक्टींग...

लिली : ॲक्टींग?

संग्राम : हो मला रंगीत तालीम करायची आहे.

लिली : इथे?

संग्राम : नाही, चौकीदाराच्या खोलीत.

लिली : तिथे रंगीत तालीम?

संग्राम : करता करता झोप आली तर झोपून जाईन.

(संग्राम सुरी उचलतो)

लिली : सुरी कशाला?

संग्राम : मी सुरीसाठीच आलो होतो.

लिली : बस थोडावेळ.

संग्राम : (सुरी दाखवत) तालमीसाठी लागेल.

(तो जायला लागतो)

लिली : एक मिनीट.

संग्राम : (थांबतो) काय?

लिली : बेबी नक्की झोपून गेली असेल.

संग्राम : मला झोप लागली नाही.

लिली : फालतू...

संग्राम : त्यात फालतू काय?

लिली : सुरी...

संग्राम : मला सुरी हवी होती.

(आणखी काही न बोलता बाहेर जातो आणि लागलीच परत दारात येऊन) दार आतून बंद करून...

लिली : जरूर नाही.

संग्राम : मग मी बाहेरून बंद करू का?

लिली : नको.

संग्राम : मग मी नुसतंच ओढून घेतो.

(दार ओढून जातो.)

लिली : ऊफ्...

(लिली अव्यक्त वेदनेने खोलीत फिरत राहते. मध्येच खिडकीतून बाहेर बघते आणि डाव्या खोलीत जाऊन स्वत:ची पर्स आणते. पर्समधून आरसा काढते. साडी नीट करते. आरशात बघून केस, चेहरा वगैरे ठाकठिक करते. परत खोलीत येरझारा घालत राहते. दार उघडून सुब्रत आत येतो.)

लिली : तुम्ही?

सुब्रत : तिथे बसून मला कंटाळा आला.

लिली : एकटेच आलात.

सुब्रत : नाही, चौकीदार मला सोडून परत गेला.

लिली : बसा.

सुब्रत : ॲक्टर कुठे आहे?

लिली : चौकीदाराच्या खोलीत.

सुब्रत : आणि बेबी?

(लिली उजव्या खोलीपाशी जाऊन कानोसा घेते.)

लिली : ती झोपली आहे.

सुब्रत : (खुर्चीवर बसत) ती दिवसभर झोपली नव्हती.

लिली : पण तुम्ही तर झोपला होतात.

सुब्रत : तुम्हीसुद्धा.

लिली : हो.

सुब्रत : मग जरा गप्पा मारू या.

लिली : गप्पात वेळ चांगला जाईल?

सुब्रत : नक्कीच.

लिली : (येऊन त्याच्या शेजारी बसते.) हो, गप्पा मारूया.

सुब्रत : करा सुरूवात.

लिली : कशाची?

सुब्रत : जे मनात येईल ते.

लिली : नाही. तुम्हीच सुरू करा.

सुब्रत : कशाबद्दल?

लिली : जे मनात येईल ते.

सुब्रत : मला तर काहीच सुचत नाही.

लिली : ॲक्टरनी आपल्याला सांगितलेली गोष्ट आठवते...

सुब्रत : हो डाकबंगल्यात येऊन बघितलं.

लिली : एका बाईला...

सुब्रत : जिनी त्याचं बोट...

लिली : चोखलं...

सुब्रत : हो.

लिली : बेबीने तुमचं बोट का नाही चोखलं?

सुब्रत : नाही.

लिली : पण का नाही?

सुब्रत : ती घमेंडखोर आहे.

लिली : सुब्रत...

सुब्रत : तिच्यादृष्टीने मी फक्त पुस्तकातला किडा आहे

लिली : तुम्ही तर तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर आहात.

सुब्रत : अंह, बुकवर्म...

लिली : वर्मा काय, माहीत आहे?

सुब्रत : काय?

लिली : ब्रूट.

सुब्रत : ब्रूट?

लिली : ह्यापासून उदासिन, अलिप्त... त्याला शिकार महत्त्वाची वाटते.

सुब्रत : तो हाडाचा शिकारी आहे.

लिली : वाघाची शिकार म्हणजे काही शिकार नव्हे.

सुब्रत : नाही.

लिली : म्हणत होते इथे येऊन सगळं विसरून जाऊ या.

सुब्रत : मी विसरलो सगळं.

लिली : ते नाही विसरले.

सुब्रत : काय?

लिली : सारखं घराबाहेर रहायची त्यांची सवय.

सुब्रत : बेबीही नाही विसरली.

लिली : काय?

सुब्रत : मी स्टडीमधून बाहेर यायच्या आत तिची झोपून जायची सवय.

लिली : वर्मा म्हणतात मी जाड आहे.

सुब्रत : बेबी म्हणते मी पुस्तकातला किडा आहे.

लिली : बुकवर्मची बोटं काय अपवित्र असतात?

सुब्रत : नाही.

लिली : तिने तुमचं बोट का नाही चोखलं?

सुब्रत : नाही.

लिली : बोट चोखलं की शरीरभर झिणझिण्या येतात.

सुब्रत : लिली!!

लिली : (सुब्रतचा हात आपल्या हातात घेते) मी...

सुब्रत : (विरोध करत) लिली!!!

लिली : (एका हाताने त्याचे डोळे झाकते) डोळे मिट तुझे... (मग दुसऱ्या हातात त्याचं बोट घेऊन चोखायला लागते.)

सुब्रत : लिली...

लिली : (सुब्रतच्या डोळ्यावरून हात काढत) आपण सगळं विसरूया.

सुब्रत : त्या खोलीत बेबी...

लिली : तू म्हणालास की तो भित्रा Coward

सुब्रत : कोण?...

लिली : ॲक्टरच्या गोष्टीचा नायक, जो पळून गेला?

सुब्रत : मी कॉवर्ड?

लिली : बुकवर्म...

सुब्रत : No....

(लिली परत सुब्रतचं बोट तोंडात घेते.)

लिली : सुब्रत ...

सुब्रत : (लिलीचा हात दोन्ही हातांनी घट्ट धरतो.) लिली... (मग दोघं एकमेकांचे

हात सोडून देतात आणि एकमेकांपासून दूर जातात. काहीवेळ दोघेही गप्प.) वर्माला तुझा कधी संशय आला?

लिली : नाही.

सुब्रत : वर्मा अगदी आदर्श नवरा आहे.

लिली : जीवनात नुसता आदर्शवादी असून चालत नाही. आणखीही काही असावं लागतं तुमच्यामध्ये.

सुब्रत : काय?

लिली : हिम्मत... साहस...

सुब्रत : पण त्यात धोका आहे.

लिली : धोक्यातही एक आनंद आहे.

सुब्रत : आनंद?

लिली : तुला नाही वाटत? (आसुसलेल्या नजरेने सुब्रतकडे बघते.) सुब्रत...

(तेवढ्यात बाहेर शेळी जोरात ओरडते.)

सुब्रत : (भीतीच्या स्वरात) ती शेळी... इतक्या जोरात....

लिली : कॉवर्ड...

सुब्रत : नाही...

लिली : (आज्ञा केल्याप्रमाणे) झोपायला जा. (सुब्रत उजव्या खोलीकडे जायला लागतो. लिली त्याला स्वतःच्या डाव्या खोलीकडे बोट दाखवते.) ह्या खोलीत.

(सुब्रत थांबतो. लिली हसत हसत त्याच्याजवळ येत, हळू आवाजात) खिडकीला गज नाहियेत... बाहेर जाता येतं...

सुब्रत काय करायचं ठरवू शकत नाही. लिली आणखी त्याच्याजवळ जात.) कॉवर्ड...

सुब्रत : (सुब्रत काहीवेळ तिच्याकडे निःशब्द बघत उभा राहतो. मग जोरात..) No.

(मग डाव्या खोलीत शिरून दिवा मालवून टाकतो. पाठोपाठ लिलीही जाते आणि दार बंद करून घेते. लागलीच बेबी तिच्या खोलीच दार उघडून मधल्या खोलीत येते. शेळी परत जोरात ओरडते. बेबी लिलीच्या खोलीवर थाप मारते. तेवढ्यात संग्राम आत येतो.)

संग्राम : शेळीला मी सोडून टाकली.

बेबी : (दारावर थाप मारत) लिली...

संग्राम : ती जोरजोरात ओरडत होती.

बेबी : लिली.... लि ऽ ऽ ली....

संग्राम : आता ती नाही ओरडणार.

बेबी : (त्याच्याकडे दुर्लक्ष करून जोरात थापा मारते.) ओह...

संग्राम : झोपल्या असतील गाढ.

बेबी : (चिडून) जा, तुम्ही जा बघू इथून.

संग्राम : मी?

बेबी : (दाराला टेकून, निराशपणे) ओह...?

संग्राम : काय झालं?

बेबी : काही नाही.

संग्राम : माझ्यापासून काही लपवू नकोस.

बेबी : तुम्हाला माहित आहे?

संग्राम : हो.

बेबी : (अस्पष्ट आवाजात) संग्राम...

संग्राम : (अस्पष्ट आवाजात) ॲक्टर...

बेबी : (जोरात ओरडते) नाही... नाही...

संग्राम : मी जातो...

बेबी : जा.. (संग्राम मागच्या दरवाज्यातून बाहेर जातो. बेबी परत दार वाजवते.) लिली... लिली...

(बेबी जोरात दरवाजा ढकलते. दरवाजा उघडतो. लिली डोळे चोळत झोपेतून उठल्यासारखी दरवाज्यात उभी राहून विचारते..)

लिली : काय झालं?

बेबी : (एकदम काहीच न सुचून हताशपणाने) नाही.... काही नाही.

लिली : (जांभई देत) मी झोपले होते.

बेबी : (मूर्खासारखी बघत) हं...

लिली : तू आत येणार आहेस का? मी दिवा लावू?

बेबी : नको.

लिली : इतक्या जोराने दार का बडवत होतीस?

बेबी : ती शेळी...

लिली : शेळीच्या ओरडण्याची भीती वाटली?

बेबी : (निश्चलपणे) नाही.

लिली : झोपायला जा.

बेबी : लिली...

लिली : मला झोप आली आहे.

बेबी : बरं!

लिली : मी दार लावते आहे.

बेबी : (तशीच निश्चल उभी आहे) ठीक आहे.

(लिली दार लावून घेते. बेबी हताशपणे एका खुर्चीवर बसते. दरवाज्यातून सुब्रत आत येतो. त्याचा चेहरा ओढल्यासारखा व कपडे चुरगळलेले. बेबी त्याच्याकडे काही न बोलता बघत राहते.)

सुब्रत : बेबी.

बेबी : काय?

सुब्रत : बसून इतका कंटाळा आला की मी निघून आलो.

बेबी : हूं...

सुब्रत : शेळी बाहेर फिरत आहे.

बेबी : जाऊन झोपा.

सुब्रत : (सारवा सारव केल्यासारखं) चौकीदार मला सोडायला आला होता. (बेबी गप्पच.) वर्मा म्हणाले, ते शिकार केल्याशिवाय परत येणार नाहीत. (बेबी अजूनही गप्पच सुब्रत बेबीच्या जवळ जात) तू काही बोलत का नाहीयेस?

बेबी : कशाबद्दल?

सुब्रत : तू अजून झोपली नाहीस?

बेबी : झोपले होते.

सुब्रत : मला बुकवर्म का म्हणालीस?

बेबी : सुब्रत.

सुब्रत : मी बुकवर्म आहे?

बेबी : सुब्रत.

सुब्रत : मी कॉवर्ड आहे. (बेबी त्याच्याकडे बघते. पण काहीच बोलत नाही.) बोल नं बोल... मी कॉवर्ड आहे.

बेबी : हो कॉवर्ड.

सुब्रत : नाही.

बेबी : झोपायला जा.

सुब्रत : नाही.

बेबी : तुला बरं वाटत नाही का?

सुब्रत : मी अगदी उत्तम आहे.

बेबी : (अधिरपणाने) सुब्रत...

सुब्रत : तू माझं बोट चोखलं का नाहीस?

बेबी : हे देवा...

सुब्रत : तुझं अंग शहारलं होतं?

बेबी : (रागाने तडफडत) सुब्रत...

सुब्रत : मी झोपणार नाहीए.

बेबी : रात्र खूप झाली आहे.

सुब्रत : ॲक्टरही झोपलेला दिसत नाहीए.

बेबी : सुब्रत...

सुब्रत : येताना मला तो खिडकीतून दिसला. सुरीला धार लावत होता.

बेबी : फालतू बडबड करू नकोस.

सुब्रत : पण तो सुरीला का बरं धार लावत होता.

बेबी : झोपायला जा सांगितलं नं!

सुब्रत : आणि तू?

बेबी : मी नाही.

सुब्रत : पण का?

बेबी : सुब्रत (सुब्रत बेबीच्या जवळ जाऊन तिच्या खांद्यावर हात ठेवतो.)

सुब्रत : ठीक आहे. आहे मी कॉवर्ड. पण तू काय आहेस?

बेबी : Please.

सुब्रत : तू घमेंडखोर आहेस.

बेबी : सुब्रत.

सुब्रत : तू माझा तिरस्कार करतेस...

बेबी : सुब्रत (बेबी त्याला गप्प करण्यासाठी त्याच्यासमोर येऊन उभी राहते.)

सुब्रत : सोड... जाऊं दे... मला बरं वाटत नाहीए. मी झोपणार आहे.

(सुब्रत उजव्या खोलीत जाऊन दार लोटून घेतो.)

बेबी : ओह...

(बेबी असहाय्यपणे एका खुर्चीत बसते.)

....

अंक तिसरा

(दुसऱ्या दिवशीची सकाळ. संग्राम भिंतीवर लावलेल्या फांद्या व पाने काढून टेबलावर ठेवत आहे. डाव्या खोलीचं दार उघडून लिली खोलीत येते. तिचे कपडे अस्तव्यस्त, चुरगळलेले केस मोकळे बघितल्यावर लक्षात येतं की रात्रभर झोपली नाहीए.)

लिली : ॲक्टर...?

(संग्राम काही न बोलता आपलं काम करत रहातो.) बेबीने हे सर्व सजवलं होतं.

संग्राम : काल दुपारी लावली होती. आता वाळून गेली आहेत. (लिली एक फांदी उचलून जवळून बघते.) सगळी नाहीत. पण खूपशी.

लिली : पण...!

संग्राम : ऊन्हं वाढली की सगळी वाळतील.

लिली : (उजव्या खोलीकडे बघत) दिवस इतका वर आला तरी अजून कोणी उठलं नाही?

संग्राम : माहीत नाही.... (लिली जायला निघते.) हे बघा... (लिली परत फिरते) बसा... (लिली बसते) तिकडे जाऊन बघून येऊ?

लिली : नको.

•(काही वेळ दोघंही गप्प)

संग्राम : तुमचा चहा झाला नसेल नं?

लिली. : नाही.

संग्राम : माझाही नाही झाला. (लिली उठायला लागते.) असू दे.

लिली : मी चहा करते.

संग्राम : घाई काय आहे. उठूं दे सगळ्यांना.

लिली : ते उठले की घेतील.

संग्राम : वर्मांनाही येऊं दे.

लिली : त्यांचं येण्याचं काही नक्की नाही.

संग्राम : म्हणजे शिकार मिळाल्याशिवाय ते परतणार नाहीत.

लिली : नाही.

संग्राम : हट्ट!

लिली : नेहमीचाच आहे.

(संग्राम पान वगैरे उचलतो आणि बाहेर जातो. लिली विस्मयाने तिथेच उभी राहते. संग्राम ते सगळं फेकून परत येतो.)

संग्राम : शेळीसाठी टाकून आलो. ती खाऊन टाकेल.

लिली : शेळी?

संग्राम : वाळलेली पान.

लिली : काही समजलं नाही.

संग्राम : काल रात्री मी तिला सोडून दिलं होतं.

लिली : मला माहित आहे.

संग्राम : तुला कसं माहित आहे?

लिली : कारण ती एकदाही ओरडली नाही.

संग्राम : कसं कळलं?

लिली : ऐकू आलं नाही.

संग्राम : का तू झोपली नव्हतीस?

लिली : नाही.

संग्राम : मी पण रात्रभर झोपलो नाही.

लिली : का?

संग्राम : मी वर्मांची वाट बघत होतो.

लिली : खोटं.

संग्राम : (हसत) ते शिकारीहून आले असते की त्यांच्याबरोबर बसून हरीण कापायला बसलो असतो.

लिली : फालतू...

संग्राम : तू शिजवलं असतंस.

लिली : शी!

संग्राम : पण मला सांग, तू झोपली का नाहीस?

लिली : झोप नाही आली.

संग्राम : आता हे मात्र खोटं.

लिली : अजिबात नाही.

संग्राम : सुब्रत काल रात्रीच परत आले. (लिली त्याच्याकडे बघते) म्हणजे शिकारीहून..

लिली : का?

संग्राम : त्यांना बरं वाटत नव्हतं.

लिली : म्हणजे?

संग्राम : रात्री छानपैकी झोपले असतील.

लिली : झोपले असतील.

संग्राम : झोपलं की बरं वाटतं.

लिली : मलाच कसंतरी होतंय.

संग्राम : बाहेर फिरून येऊ या. बरं वाटेल.

लिली : बाहेर?

संग्राम : जितकं दूर जाता येईल तितकं जाऊ या.

लिली : नको.

संग्राम : झऱ्याच्या काठी जाऊन बसू या.

लिली : ॲक्टर!

संग्राम : तू माझं बोट घेऊन...

लिली : नाही.

संग्राम : सुब्रत कॉवर्ड आहे.

लिली : तूसुद्धा.

संग्राम : नो.

लिली : हो.

संग्राम : पाहिजे तर अजमावून घे.

लिली : घेतलं आहे.

संग्राम : त्यादिवसाबद्दल बोलते आहेस?

लिली : कॉवर्ड!

संग्राम : त्यादिवशी नाही झालं धाडस.

लिली : आज?

संग्राम : आहे!

लिली : नक्की?

संग्राम : हो.

लिली : मला नाही वाटत.

संग्राम : त्यादिवशी माझा माझ्यावर विश्वास नव्हता.

लिली : आणि आज?

संग्राम : अर्थातच आहे.

लिली : तू इथे का आला होतास?

संग्राम : तू का आली होतीस? (लिली उत्तर देत नाही.) मला माहित आहे. (काही वेळ दोघंही गप्प)

लिली : काय माहिती आहे तुला?

संग्राम : वर्मांच्या बरोबर तू टूरवर...

लिली : हो.

संग्राम : वर्मा उदासिन...

लिली : पण तू का आला होतास?

संग्राम : परत जाण्यासाठी.

लिली : कशाला लपवतोस?

संग्राम : पण आज परत जाण्यासाठी आलो नाहीए. (लिली आश्चर्याने त्याच्याकडे बघते. संग्राम हसत हसत) भेकडं माघार घेतात.

लिली : अगदी बरोबर.

संग्राम : अनुभव आहे.

लिली : कशाचा?

संग्राम : की तू भ्याड आहेस.

लिली : अजिबात नाही.

संग्राम : मी कॉलेजमध्ये शिकत होतो...

लिली : कॉलेजमध्ये?

संग्राम : आणि माझ्याकडे पैसेही नव्हते.

लिली : आणि आज?

संग्राम : भरपूर, सोन्याच्या खाणी शोधतोय.

लिली : मला भ्याड का म्हणालास?

संग्राम : साहस म्हणजे काही तोंडच्या गप्पा नव्हे.

लिली : कोणाच्या तोंडच्या?

संग्राम : साहस नाही होत?

लिली : होतंय की.

संग्राम : मग चल.

लिली : जरा थांब.

(लिली डाव्या खोलीत जायला लागते.)

संग्राम : जर वर्मा परत आले...

लिली : (थांबते) आता कोण भ्याड?

संग्राम : मला कोणाचीही भीती नाही.

लिली : मग काय मला आहे?

संग्राम : ते तुझं तुलाच माहीत.

लिली : नाही. मला नाहीए.

संग्राम : झऱ्याच्या काठी जाऊन बसू या.

लिली : नको.

संग्राम : नको?

लिली : इथून निघून जाऊ या.

संग्राम : निघून जाऊ या?

लिली : हो, परत न येण्यासाठी.

संग्राम : ठीक आहे, परत न येण्यासाठी.

लिली : खरं सांगू?

संग्राम : काय?

(संग्रामचे दोन्ही हात हातात घेऊन)

लिली : तू कॉवर्ड नाहीस.

संग्राम : (हसत) नाही, सुब्रतसारखा कॉवर्ड नाही.

लिली : (हात सोडून) नाही.

(लिली जायला लागते.)

संग्राम : तू आत का जातेस?

लिली : अशा वेशात?

संग्राम : ओह...

लिली : जास्तवेळ नाही लागणार.

संग्राम : लवकर...

लिली : जरा केस विंचरून... कपडे बदलून...

संग्राम : मी वाट बघतोय...

(लिली संमत्तीदर्शक हसत हसत डाव्या खोलीत शिरून दार बंद करून घेते. संग्राम उरलेल्या डहाळ्या काढत असतो. बेबी उजव्या खोलीचं दार उघडून आत येते.)

बेबी : संग्राम.

संग्राम : मला ॲक्टर म्हण. (बेबी खुर्चीत बसते.) काय बरं वाटत नाहीए? (बेबी काही न बोलता त्याच्याकडे बघते.) रात्रभर मी झोपलो नाही.

बेबी : का?

संग्राम : रंगीत तालीम करत होतो.

बेबी : रंगीत तालीम?

संग्राम : हो. मोनोऍक्टींगची.

बेबी : संग्राम.

संग्राम : शेळी एक पाळीव प्राणी आहे. पाळीव प्राणी शेळी एक. प्राणी शेळी एक पाळीव. पाळीव शेळी एक प्राणी. शेळी एक प्राणी पाळीव.

बेबी : Oh, Stop it...

संग्राम : काय झालं?

बेबी : मला हे काही आवडत नाही.

संग्राम : मग नाटक कर.

बेबी : नाटक?

संग्राम : शेक्सपिअर...

बेबी : नाही.
संग्राम : रोमिओ आणि ज्युलिएट...
बेबी : संग्राम
संग्राम : कॉल मी बट लव्ह अँड आय वील बी न्यू बॅपटाईज्ड् ...
बेबी : राहू दे...
संग्राम : कॉलेजमध्ये आपण नाटकात एकत्र कामं केली होती.
बेबी : हो.
संग्राम : मग आपण इथे आलो होतो.
बेबी : हो.
संग्राम : आज परत इथेच आलो आहोत.
बेबी : संग्राम.
संग्राम : (बेबीकडे बघत ओठ दाबून हसत) आज परत...
बेबी : (रागावून) आज तू का आला आहेस इथे?
संग्राम : सोन्याच्या खाणीच्या शोधात...
बेबी : खोटं.
संग्राम : मी बडा असामी झालोय.
बेबी : साफ खोटं.
संग्राम : खोटं तर खोटं.
बेबी : मग का आलास तू इथे?
संग्राम : तूला भेटायला.
बेबी : संग्राम
संग्राम : विचारायला
बेबी : काय?
संग्राम : काल रात्री मला तू निघून जायला का सांगितलंस?
बेबी : झोपायला जायला सांगितलं.
संग्राम : चौकीदाराच्या खोलीत?
बेबी : तिथेच तू झोपत होतास.
संग्राम : मी रात्रभर झोपलो नाही.

बेबी : म्हणालास मगाशी.

संग्राम : सराव करत होतो.

बेबी : हं.

संग्राम : तुझं काय?

बेबी : कशाबद्दल?

संग्राम : तूला लागली झोप?

बेबी : का विचारतोयस?

संग्राम : सुब्रत रात्री परत आला होता ना?

बेबी : हो.

संग्राम : मला का नाही बोलावलंस?

बेबी : कशासाठी?

संग्राम : गप्पा मारत बसलो असतो.

बेबी : संग्राम

संग्राम : शेळीला मी सोडलं होतं.

बेबी : होतं?

संग्राम : ती ओरडतही नव्हती.

बेबी : नव्हती.

संग्राम : पण आपण काय गप्पा मारल्या असत्या?

बेबी : तेच, काय गप्पा मारल्या असत्या?

संग्राम : जुन्या आठवणींबद्दल.

बेबी : नाही...

संग्राम : त्यादिवशी लिलीही इथेच होती.

बेबी : हो.

संग्राम : तू बघितलंस.

बेबी : राहू दे...

संग्राम : आणि निघून गेलीस.

बेबी : मग आणखी काय करणार होते मी?

संग्राम : ओह, बिचारी लिली...

बेबी : संग्राम!

संग्राम : तेव्हा मी तिला ओळखतही नव्हतो.

बेबी : आज?

संग्राम : ओळखतो. वर्मांची बायको म्हणून. (दोघंही थोडावेळ गप्प) एक गोष्ट विचारू?

बेबी : काय?

संग्राम : खरं सांगशील?

बेबी : पण काय?

संग्राम : सुब्रतचं वागणं स्वच्छ आहे?

बेबी : संग्राम

संग्राम : काही लपवालपवी करू नकोस.

बेबी : (असहाय्यतेने) काही लपवत नाहीए.

संग्राम : परत ती लिलीच.

बेबी : हो.

संग्राम : आणि सुब्रत...

बेबी : तोही...

संग्राम : त्यादिवशी माझं वागणं स्वच्छ नव्हतं. (बेबी त्याच्याकडे व्याकुळतेने बघते.) आणि आता सुब्रतच.... (बेबी उठून जायला लागते संग्राम तिच्यासमोर उभा रहातो.) त्याचं वागणं आहे स्वच्छ?

बेबी : नाही.

संग्राम : त्यादिवशी मला आणि लिलीला तू एकत्र बघितलंस आणि डाकबंगल्यावरून निघून गेलीस.

बेबी : मग आज काय करणार आहेस? असंच ना...

संग्राम : हो, तसंच.

बेबी : अगदी निष्ठूर आहेस.

संग्राम : तसा असतो तर परत इथे आलो नसतो.

बेबी : ऐकायचंय मी काय करेन?

संग्राम : काय?

बेबी : आत्महत्त्या!

संग्राम : ओह, नो.

बेबी : (असहाय्यपणे) मग मी दुसरं काय करणार?

संग्राम : मी सांगतो तुला.

(संग्राम खिशात हात घालून चाकू बाहेर काढतो आणि उघडून बेबीसमोर धरतो.)

बेबी : (काही न समजून) हे काय?

संग्राम : खून... (बेबी काही न समजून चाकू हातात घेते.) सुब्रतचा... (बेबीच्या हातातून चाकू गळून पडतो.)

बेबी : संग्राम!

संग्राम : कलंकित, ट्रेरर...

बेबी : (भीतीने) नाही, नाही.

संग्राम : (चाकू उचलून) छान धारदार आहे. तू ह्याने कांदे कापले होतेस. डहाळ्या कापल्या होत्यास.

बेबी : (असहाय्यपणे) ओ ऽ ऽ ऽ...

संग्राम : चल आपण इथून पळून जाऊ या.

बेबी : कुठे जाणार?

संग्राम : झऱ्याच्या काठी बसूया... खूप दूरदूर निघून जाऊ या.

बेबी : संग्राम!

संग्राम : मी तुझी खूप दिवस वाट बघितली.

बेबी : (संमोहित स्वरात) खूऽऽप दिऽऽवस?

संग्राम : (नाटकीपणाने) 'कॉल मी बट लव्ह अँड आय विल बी न्यू बॅपटाईज्ड्'.

बेबी : संग्राम...!

संग्राम : बेबी...

बेबी : किती दूऽऽर...?

संग्राम : खूऽऽऽप दूर....

बेबी : खूऽऽप खूऽऽप दूर...

(बेबी चुपचाप आपल्या खोलीत जाते. संग्राम चाकू बंद करून आपल्या खिशात ठेवतो आणि लिलीच्या दारावर हलकेच थाप मारतो.)

संग्राम : लिली... लिली...

(सुब्रत अर्धवट दाढी करून उजव्या खोलीतून बाहेर येतो. हातात रेझर व खांद्यावर पंचा आहे)

सुब्रत : अजून उठली नाही वाटतं?

संग्राम : उठली आहे.

सुब्रत : मग दार का बंद आहे?

संग्राम : टॉयलेट...

सुब्रत : ओ...

(सुब्रत बसून दाढी पूर्ण करतो. संग्राम सुरी हातात घेऊन सुब्रतच्या जवळ जातो.)

संग्राम : टू बी ऑर नॉट टू बी, दॅट इज द क्वेश्चन...

सुब्रत : म्हणजे?

संग्राम : ॲक्टींग...

सुब्रत : ओह...

संग्राम : मग काय करू शकला?

सुब्रत : कशाबद्दल?

संग्राम : लिली मेकअप करतेय.

सुब्रत : मेकअप?

संग्राम : ती नक्की साडी बदलत असेल.

सुब्रत : का?

संग्राम : पावडर वगैरे लावत असेल.

सुब्रत : ओह...

संग्राम : काल रात्री छान वाटलं की नाही?

सुब्रत : नाही.

संग्राम : जेवण अंगावर आलं का?

सुब्रत : हो.

संग्राम : (परत नाटकीपणे) टू बी ऑर नॉट ट बी दॅट इज द क्केश्चन...

सुब्रत : परत परत तेच.

संग्राम : हो, ॲक्टींग

सुब्रत : काल रात्रीही असंच...

संग्राम : चौकीदाराच्या खोलीत?

सुब्रत : हो, काल रात्री.

संग्राम : रात्री परत येताना... तुम्ही असं बघितलं होतं...

सुब्रत : (हसत) हो.

संग्राम : मी रंगीत तालीम करत होतो.

सुब्रत : हा चाकू हातात घेऊन?

संग्राम : मोनोॲक्टींग.

सुब्रत : टू बी ऑर नॉट टू बी...

संग्राम : हो.

सुब्रत : (दाढी संपलेली आहे. उठतो आणि लिलीच्या खोलीजवळ जाऊन) लिली...

संग्राम : तिच अजून आवरलं नसेल.

सुब्रत : काय?

संग्राम : तेच, म्हणालो नव्हतो का ती मेकअप...

सुब्रत : (आपल्या जागी परत येत.) ओ हो...

संग्राम : आता आज छान वाटतयं का?

सुब्रत : आज?

संग्राम : हो आज.

सुब्रत : हो.

संग्राम : मला नाही तसं वाटत.

सुब्रत : कशावरून?

संग्राम : एक अंदाज.

सुब्रत : (तुच्छतेनी) नुसता अंदाज?

संग्राम : मग काय करणार आहात?

सुब्रत : कशाबद्दल?

संग्राम : लिली आता येईलच.

सुब्रत : का हाही अंदाजच?

संग्राम : मेकअप संपवून ती दार उघडेल.

सुब्रत : मी काय करीन असं तुम्हाला वाटतं?

संग्राम : काहीच अंदाज लावू शकत नाही.

सुब्रत : (परत तुच्छतेनी) सुंदर!

संग्राम : सेक्सी...

सुब्रत : ओह...

संग्राम : (चाकू पुढे करत) चाकू?

सुब्रत : (आश्चर्यानी) चाकू-?

संग्राम : टू बी ऑर नॉट टु बी...

सुब्रत : हॅम्लेट.

संग्राम : हो. हॅम्लेट.

सुब्रत : हं. (सुब्रत संग्रामच्या हातून चाकू घेतो.)

संग्राम : वर्मा येतच असतील.

सुब्रत : येऊ देत.

संग्राम : हातात बंदूक असेल...

सुब्रत : (दृढ स्वरात) असूदे...

संग्राम : फारच छान.

सुब्रत : काय?

संग्राम : ॲक्टींग.

सुब्रत : नाही

संग्राम : बेबी विरोध करेल.

सुब्रत : छा ऽ ऽ ऽ

संग्राम : लिली आपला विचार बदलेल.

सुब्रत : नाही.

संग्राम : वर्मा अडवतील.

सुब्रत : नाही.

संग्राम : अशक्यही नाही.

सुब्रत : माझ्या हातात चाकू आहे.

संग्राम : खून?

सुब्रत : हो.
संग्राम : (चमकून) लिलीसाठी?
सुब्रत : आणखी काय करणार?
संग्राम : वर्मा स्पोर्टस्‌मन आहे.
सुब्रत : मी?
संग्राम : प्राध्यापक (हसत म्हणतो)
सुब्रत : नाही, स्पोर्टस्‌मन.
संग्राम : मॉम् वाचलं आहेत?
सुब्रत : मॉम्?
संग्राम : समरसेट मॉम्.
सुब्रत : हो.
संग्राम : द रेन?
सुब्रत : वाचलंय.
संग्राम : डेविडसन... रेनचा नायक...?
सुब्रत : आत्महत्त्या करतो.
संग्राम : डेविडसन सारखी गळा कापून घेऊन आत्महत्त्या.
सुब्रत : नाही.
संग्राम : भेकड माणसं आत्महत्त्या करतात.
सुब्रत : वर्मांपेक्षा मी नक्कीच कमकुवत नाहीये.
संग्राम : (त्याला आपादमस्तक न्याहाळत) नाही आहात... मला वाटतं नाही आहात.
सुब्रत : मग आत्महत्त्या का?
संग्राम : दुसऱ्यांपेक्षा.
सुब्रत : कोण दुसरे?
संग्राम : जो सबल आहे.
सुब्रत : तो कोण?
संग्राम : ज्याच्याबरोबर लिली झऱ्याकाठी जाऊन बसेल, तो!
सुब्रत : कोणाबरोबर?

संग्राम : तुम्हाला कोण वाटतं?

सुब्रत : कोणाबरोबर?

संग्राम : (मागण्याचा अभिनय करत) चाकू...

सुब्रत : (धार बघत बघत) नाही.

संग्राम : हात कापेल.

सुब्रत : चालेल.

संग्राम : नाही (म्हणत सुब्रतच्या हातातून चाकू काढून घेतो.)

सुब्रत : कोणाबरोबर?

संग्राम : तुमचा काय अंदाज?

(त्याचवेळी बेबी उजव्या खोलीतून येते.)

सुब्रत : बेबी...

संग्राम : (बाहेर जाता जाता) आलोच.

बेबी : चहा आणू?

सुब्रत : ॲक्टर...

(थांबण्यासाठी संकेत करून संग्राम बाहेर जातो.)

बेबी...

बेबी : काय?

सुब्रत : बस.

(बेबी शांतपणे बसते सुब्रत तिच्याजवळ जातो.)

तू माझ्याशी का बोलत नाहीस?

बेबी : बोलतेय की.

सुब्रत : काल रात्री बोलली नव्हतीस.

बेबी : बोलले होते.

सुब्रत : केव्हा. सरळ झोपायला तर गेलीस.

बेबी : दुसरं काहीच करण्यासारखं नव्हतं.

सुब्रत : बसून गप्पा मारल्या असत्या...

बेबी : लिली होती की...

सुब्रत : तूही होतीस...

बेबी : मला बरं वाटत नव्हतं.

सुब्रत : तू मला बुकवर्म का म्हणतेस?

बेबी : आता परत नाही म्हणणार.

सुब्रत : बेबी.

(काही वेळ दोघंही गप्प.)

बोल न काहीतरी?

बेबी : (दु:खानी) काय बोलू?

(असं म्हणून थोडा वेळ गप्प बसते आणि एकदम उभी राहून)

मी परत जाणार आहे.

सुब्रत : का?

बेबी : पिकनीक संपली आहे.

(बेबी उजव्या खोलीकडे जायला लागते.)

सुब्रत : एक मिनीट...

बेबी : (थांबून) काय?

सुब्रत : हा, ॲक्टर कोण आहे?

बेबी : एक गेस्ट.

सुब्रत : तो खरंच का सोन्याच्या खाणीच्या शोधात आहे?

बेबी : तो सांगतो तरी तसं.

सुब्रत : वेडा आहे.

बेबी : तुम्ही सुद्धा

सुब्रत : मी वेडा नाही.

बेबी : मग छानच.

सुब्रत : तू परत का जाणार?

बेबी : मग मी काय करू?

सुब्रत : मी पण जातो.

बेबी : का?

सुब्रत : बाहेर झरा आहे...

बेबी : त्याच्याकाठी जाऊन बसणार?

सुब्रत : हो.

बेबी : फारच सुंदर कल्पना.

सुब्रत : तुझं काय?

बेबी : नाही.

सुब्रत : नाही?

बेबी : लिली...

सुब्रत : बेबी.

बेबी : काल रात्री.

सुब्रत : (एकदम चमकतो) काय?

बेबी : तुम्ही... त्या खोलीत...

सुब्रत : बेबी!

बेबी : काही लपवू नका.

सुब्रत : मी नव्हतो.

बेबी : हो तुम्हीच.

सुब्रत : नाही, ॲक्टर.

बेबी : नाही तुम्हीच.

सुब्रत : झोप यायला लागली म्हणून मी निघून आलो.

बेबी : (जायला लागते) जाऊ दे.

सुब्रत : (तिला थांबवत) बेबी...

बेबी : मी सामान बांधायला घेते.

सुब्रत : तू जाणार का?

बेबी : सांगितलं न जाणार म्हणून

सुब्रत : (असहायपणे) ओ.

बेबी : मी बोलावू का...?

सुब्रत : कोणाला?

बेबी : तुमच्याजवळ बसून गप्पा मारायला.

सुब्रत : बेबी.

बेबी : झऱ्याकाठी नाही जाणार?

सुव्रत : (रागानी विचारतो) कोणाला बोलावणार?

बेबी : लिली...

सुव्रत : बेबी.

बेबी : हो लिलीला...

(डाव्या खोलीतून लिली येते. तिनी जबरदस्त मेकअप केला आहे. नवीन आकर्षक केशरचना आहे आणि साडी बदलली आहे.)

सुव्रत : (लिलीकडे बघत) लिली.

बेबी : (तोंडावर हात ठेऊन) ओ गॉड्!

लिली : (पर्समधून छोटा आरसा बाहेर काढते आणि चेहरा बघते.) पावडर फार झाली आहे का?

(रूमालानी चेहरा थोडा पुसते.)

बेबी : ठीक आहे.

लिली : सकाळपासून कोणीच चहा घेतला नाही.

सुव्रत : वर्मा अजून आले नाहीत...

लिली : एकदा ते शिकारीला गेले की परत यायची वेळ नक्की नसते.

बेबी : बरोबर.

लिली : ह्या साडीत मी जाड वाटते का?

सुव्रत : लिली

लिली : साडी तशी खूपच तलम आहे.

सुव्रत : हो.

लिली : आणखी काय केलं तर मी सडपातळ दिसेन?

बेबी : सकाळी फिरायला जात जा.

लिली : फिरायलाच निघाले आहे.

बेबी : झऱ्याच्या काठी?

लिली : तू येणार का?

बेबी : नाही

लिली : आणि तुम्ही?

सुव्रत : मी?

लिली : नाही न!

सुब्रत : लिली...

लिली : ठीक आहे. (जोरात हाक मारते) ॲक्टर...

सुब्रत : ॲक्टर...

(संग्राम आत येतो.)

संग्राम : टू बी ऑर नॉट टू बी, दॅट इज द क्वेश्चन?...

सुब्रत : ॲक्टर.

संग्राम : टू बी ऑर नॉट टू बी...

लिली : मी तयार आहे.

संग्राम : (सुब्रतला) चला.

सुब्रत : कुठे?

संग्राम : झऱ्याच्या काठी.

बेबी : सुब्रत...

सुब्रत : नाही.

संग्राम : (सुब्रतला) हिपोक्रिट.

सुब्रत : ॲक्टर...

संग्राम : बुकवर्म...

सुब्रत : लिली...

संग्राम : कॉवर्ड...

सुब्रत : ओह...

संग्राम : (हसत हसत) काय शब्द सुचत नाहीत का?

सुब्रत : नो... नो...

संग्राम : भेकड माणसांना बोलायला सुचत नाही.

सुब्रत : नाही, मी भेकड नाही.

संग्राम : धीट साहसी माणसांना भाषेची उणीव भासत नाही.

सुब्रत : (उठून उभा राहतो) तू काय स्वतःला साहसी समजतोस की काय.

संग्राम : अर्थातच.

सुब्रत : (असाहयपणे) बेबी...

बेबी : हे चाललेलं सगळं मला काही पसंत नाही.

सुब्रत : (आणखी अगतिकपणे) लिली...

लिली : (संग्रामला) चला आपण निघू या...

बेबी : ॲक्टर...

संग्राम : अभिनय... शुद्ध अभिनय.

सुब्रन : शुद्ध अभिनय?

संग्राम : (बेबीला) हो की नाही?

बेबी : मला अभिनय येत नाही.

संग्राम : सगळेजण अभिनय करतात.

बेबी : सगळेजण?

(बेबी खिडकीकडे जाते.)

लिली : चला.

सुब्रत : (तिची वाट अडवत) नाही.

लिली : (त्याल दूर व्हायला सांगत) सुब्रत.

सुब्रत : नाही.

लिली : कॉवर्ड.

सुब्रत : कॉवर्ड?

संग्राम : हो कॉवर्ड.

(बेबी खिडकीतून डोकं बाहेर काढून बघत असते आणि मग हाक मारते.)

बेबी : चौकीदार.

लिली : चौकीदार.

(लिलीपण खिडकीजवळ जाऊन बहेर बघते.)

सुब्रत : चौकीदार येतोय?

बेबी : हो.

सुब्रत : आणि वर्मा

लिली : ते दिसत नाहीत.

(चौकीदार आत येतो.)

चौकीदार : साहेब माझी शेळी...

संग्राम : शेळी एक पाळीव प्राणी...
प्राणी पाळीव एक शेळी...
पाळीव प्राणी एक शेळी...
शेळी प्राणी एक पाळीव....

सुब्रत : ॲक्टर

संग्राम : (हसत हसत) शेळी?

चौकीदार : साहेब... माझी शेळी मला कुठे दिसत नाही... साहेब... सकाळी थोड काहीतरी खायला घालून मी तिला सोडत असे. साहेब... डाकबंगल्यात जे साहेब लोक येतात त्यांचं उरलंसुरलं अन्न मी शेळीला देत असे. आणि मग सोडत असे... साहेब मी तिला डाकबंगल्याभोवती सगळीकडे शोधून आलो... पण माझी शेळी साहेब...

संग्राम : अरे ती कुठेतरी इकडे तिकडे चरत असेल.

चौकीदार : बाहेर काही वाळक्या डहाळया, पानं वगैरे पडली आहेत. डाकबंगल्याच्या मागच्या बाजूला खूप झाडं-झुडपं आहेत. पण ती कुठेच दिसत नाही साहेब...

सुब्रत : नाही आहे? मग शेळी गेली तरी कुठे?

चौकीदार : साहेब, शेळीच माझं सर्वकाही आहे. माझं सर्वस्व... तुम्ही सगळे निघून जाल, साहेब. देवास ठाऊक परत कोणी केव्हा येईल ते... तिच्यातच माझा वेळ जातो... कशी ती सुटली कोणास ठाऊक...

संग्राम : ती सुटली नाही.

चौकीदार : म्हणजे हुजूर...?

संग्राम : मी तिला सोडली...

चौकीदार : तुम्ही सोडलीत साहेब? ओरडत होती का? मला शोधत होती का ती?

(चौकीदार जायला लागतो.)

सुब्रत : हे बघ...

चौकीदार : जंगलात कुठेतरी भटकली असेल. आता जाऊन मला शोधली पाहिजे.

सुब्रत : वर्मासाहेब कुठे आहेत?

चौकादार : अजून ते आले नाहीत?

बेबी : म्हणजे?

चौकीदार : खूऽप वेळ झाला आता... बाईसाहेब आम्हाला दोन मोठे डोळे दिसले...

आणि साहेबांनी फायर केलं.

संग्राम : म्हणजे नक्कीच वाघ.

चौकीदार : जनावर मग जंगलात शिरलं. साहेबही बंदूक घेऊन त्याच्या मागावर गेले. मला वाटतं गोळी त्याच्यावर बसली नाही. सकाळ होत आली म्हणून मला वाटलं साहेब परत आले असतील. मी थोडावेळ वाट बघितली. मग शेळीचीही काळजी वाटायला लागली म्हणून मी निघून आलो.

बेबी : मग वर्मा...

संग्राम : नक्कीच माणूस खाणारा वाघ.

सुब्रत : ॲक्टर...

लिली : बंदूक आहे त्यांच्याजवळ.

बेबी : वाघ नसेलही कदाचित.

संग्राम : वाघच.

चौकीदार : साहेब, वाघच असेल.

लिली : हरीण असेल.

बेबी : असेलही.

सुब्रत : मग इतका वेळ का लागला...?

लिली : (उपहासानी) सवयच आहे.

(लिली डाव्या खोलीकडे जायला लागते.)

संग्राम : कुठे निघालीस?

लिली : (चेहरा वर करत) हे बघ काय?

बेबी : (तिच्याजवळ जात) काय?

सुब्रत : (लिलीच्या जवळ जाऊन तिचा चेहरा बघत) घाम आलाय.

संग्राम : अजून थोडी पावडर...

बेबी : पावडर!

लिली : आलेच.

(लिली डाव्या खोली जाते.)

संग्राम : खरं काय ते लिलीला माहिती आहे का?

बेबी : काय?

संग्राम : वाघ.

चौकीदार : हो साहेब नक्कीच वाघ.

संग्राम : माणसं खाणारा वाघ.

सुब्रत : ॲक्टर...

संग्राम : वर्मांना नक्कीच वाघाने खाल्लं असेल.

सुब्रत : चौकीदार!

चौकीदार : साहेब... माझं धाडस कसं होईल... हे बोलण्याचं?

सुब्रत : चौकीदार!

चौकीदार : वाघाची शिकार साहेब... त्यात मचाण सोडून साहेब खाली उतरलेले... पुढचं काय झालं... कोण साहस करेल सांगायचं?

सुब्रत : नाही...

चौकीदार : आता चांगलं उजाडलंय. मी जाऊन बघून येतो साहेब.

सुब्रत : नको.

चौकीदार : साहेब कोणीही बाहेर पडू नका. वाघ जर का गोळीने जखमी झाला असेल तर... आणि नेमकी ह्याचवेळी ही शेळी कुठे गेली कोणास ठाऊक?

(चौकीदार बाहेर जातो.)

संग्राम : चौकीदारालाही चांगलं माहित आहे.

सुब्रत : काय?

संग्राम : वर्मा आता नाहीत ते.

सुब्रत : ॲक्टर!

संग्राम : बिचारी लिली...

सुब्रत : (अस्वस्थपणे) अशक्य...

संग्राम : (बेबीकडे बघत) आता उशीर कशाला? चल जाऊ या...

बेबी : कुठे?

संग्राम : झऱ्याच्या काठी.

बेबी : झऱ्याकाठी?

संग्राम : नाहीतर खूप दूर...

सुब्रत : ॲक्टर...

संग्राम : लिलीला उशीर होईल.

सुब्रत : लिली नाही येणार.

संग्राम : पण बेबी येईल...

सुब्रत : (जोरात ओरडून) ॲक्टर!

संग्राम : (हसत हसत) विचारत होतो कोण जास्त बलवान? बेबी?

बेबी : खरंच?

संग्राम : मी आहे बलवान.

बेबी : (उपहासाने) ओह! खरंच का?

सुब्रत : ॲक्टर...

संग्राम : लिली येईल म्हणालो तर विश्वास बसला नाही. आता बेबी आली तर...

सुब्रत : बेबी...

संग्राम : मी सांगितलं होतं जास्त सामर्थ्यवान, साहसी...

सुब्रत : ब्रूट...

संग्राम : (हसत हसत) ब्रूट...

बेबी : ब्रूट

(लिली येते.)

लिली : वर्मा?

बेबी : आले नाहीत.

लिली : ब्रूट कोण?

(संग्राम हसत हसत सुब्रतकडे बोट दाखवतो.)

सुब्रत : नाही.

बेबी : (असह्य होऊन) ओऽऽ नोऽऽ

संग्राम : झऱ्याकाठी बसलं की तुला बरं वाटेल.

लिली : बेबी?

संग्राम : (बेबीला) चल, त्यादिवशी बसलो होतो तसे बसूया.

सुब्रत : त्यादिवशी, केव्हा गेला होतात?

संग्राम : सांगून टाक.

बेबी : तो वेडा झाला आहे.

लिली : (मत्सराने) कुठल्या दिवशी?

संग्राम : त्यादिवशी बसलो होतो तसे... त्यादिवशी

लिली : ओह...

सुब्रत : कुठल्या दिवशी?

संग्राम : (लिलीला) सांग की?

सुब्रत : लिली सांगेल?

संग्राम : हो लिली सांगेल.

लिली : छेऽऽऽ

सुब्रत : ओह ऽऽऽ

संग्राम : (हसत हसत) अभिनय... ॲक्टींग... बोअरिंग. (संग्राम सुब्रतच्या अगदी जवळ येत) अगदी बोअरिंग.

सुब्रत : हो बोअरिंग.

बेबी : (सुब्रतच्या जवळ येत) सकाळपासून तुमचा चहा झाला नाही.

संग्राम : त्यात रात्रभर झोपही झाली नाही.

सुब्रत : बेबी...

संग्राम : कॉल मी बट लव्ह अँड आय विल बी....

सुब्रत : (बेबीकडे बघत) कॉल मी बट लव्ह अँड आय विल बी...

बेबी : (आनंदाने) सुब्रत... आहा....!

संग्राम : पण... बुकवर्म.... कॉवर्ड... आत्महत्त्या... मर्डर... (नाटकीपणे बेबीसमोर उभा राहून) फक्त एकदा... कॉल मी बट लव्ह...

लिली : ओ ऽ ॲक्टर...

संग्राम : (बेबीसमोर तसाच उभा आहे) अँड आय विल बी न्यू बॅपटाईज्ड्.

बेबी : .... छट्!

(बेबीच्या चेहऱ्यावर तिरस्कार आहे. ती संग्रामला ढकलून उजव्या खोलीत जाते.)

संग्राम : मी तिला अडवू शकलो नाही.

सुब्रत : ओ ऽऽ

संग्राम : कॉल मी बट लव्ह अँड आय विल बी...

सुब्रत : (चिडून) ॲक्टर...

संग्राम : लढाई करणार?

सुब्रत : हो.

लिली : पण लढाई कशासाठी?

संग्राम : लढाईसाठी दोन पक्ष लागतात.

सुब्रत : ॲक्टर माझा प्रतिपक्ष आहे.

संग्राम : मग लढाई करणार का?

सुब्रत : अर्थातच.

संग्राम : बॉक्सींग.

सुब्रत : चालेल.

संग्राम : बिचारा प्राध्यापक.

सुब्रत : (संग्रामच्या जवळ जात) चला होऊन जाऊ दे!

लिली : सुब्रत...

संग्राम : (सहज हसत हसत) नाही.

सुब्रत : कॉवर्ड...

संग्राम : (सुब्रतच्या जवळ जात) कॉवर्ड कधी लढाई करतो
(लिली दोघांच्या मधे येण्याचा प्रयत्न करते.)

लिली : ॲक्टर...

संग्राम : मी कॉवर्ड नाहीये.

सुब्रत : (लिलीला दूर सारायचा प्रयत्न करत) लिली...

संग्राम : मला लढाई करायची नाही.

सुब्रत : शेम... शेम...

संग्राम : (उपहासाने) शेम...

लिली : ॲक्टर...

सुब्रत : कॉवर्ड...

संग्राम : नाही, वेडा.

सुब्रत : हो, वेडाच.

(सुब्रत उजव्या खोलीत जातो. संग्राम लिलीजवळ जातो.)

संग्राम : वेडा का नकोसा झालेला?

लिली : तुझ्याबरोबर कोण होतं त्यादिवशी?
संग्राम : लिली.
लिली : सांग मला, कोण होतं...?
संग्राम : तुला माहीत आहे.
लिली : होय.
संग्राम : हो, बेबीच होती.
लिली : (जोरात ओरडते) ब्रूट.
संग्राम : सुव्रत, तो कॉवर्ड...
लिली : म्हणजे त्यादिवशी तू बेबीसाठी निघून गेलास.
संग्राम : होय.
लिली : मी तिला बोलावते.
संग्राम : लिली...
लिली : काल तू शिक़ारीला का नाही गेलास?
संग्राम : दिवसभर फिरत होतो.
लिली : माझा नाही विश्वास बसत.
संग्राम : हेवा वाटतोय का?
लिली : ॲक्टर...
संग्राम : पण मला नाही हेवा वाटत...
लिली : पुन्हा नाटक सुरू...
संग्राम : जास्त बोलू नकोस.
लिली : का?
संग्राम : नाही, घाम येऊन तुझा मेकअप खराब होईल.
लिली : ॲक्टर...
संग्राम : चल.
लिली : नाही.
संग्राम : आपण झऱ्याकाठी बसू या.
लिली : आणि मग?
संग्राम : आपण दूर.... खूप दूर जाऊ या.

लिली : तू परत नाही येणार?

संग्राम : नाही.

लिली : पण बेबी तर इथे आहे.

संग्राम : बेबी एक पाळीव प्राणी ....

लिली : आणि मी?

संग्राम : तू जंगली पाळीव प्राणी...

लिली : आणि तू?

संग्राम : मी नुसताच .... पशू.

लिली : हो पशूच आहेस.

संग्राम : सुब्रतला बोलावू का?

लिली : सुब्रतला?

संग्राम : हो. सुब्रत निरुपद्रवी आहे.

लिली : म्हणजे?

संग्राम : बेबी त्याच्याबरोबर आहे. त्यामुळे वर्माला त्याचा संशय येणार नाही.

लिली : छी. अगदी फालतू.

संग्राम : बायको बरोबर असली की तिच्या नवऱ्याचा कोणी संशय घेत नाही.

लिली : (चिडून) मी जाणार नाही.

संग्राम : सुब्रतच्या बरोबर?

लिली : नाही तुझ्याबरोबर.

संग्राम : का, का नाही येणार?

लिली : मी काही प्रॉक्सि नव्हे.

संग्राम : मग का मी आहे?

लिली : (रागने) हो, तूच आहेस.

संग्राम : मला माहित होतं.

लिली : काय?

संग्राम : एकदम हा बदल...

लिली : नाही.

संग्राम : स्वाभाविकच आहे म्हणा.

लिली : काय स्वाभाविक?

संग्राम : असा हा बदल.

लिली : वर्मा येतीलच.

संग्राम : त्यादिवशी... एकदम... माझ्या हाताचं बोट...

लिली : राहू दे.

संग्राम : मग मी निघून गेलो.

लिली : मला नाही पटत.

संग्राम : आणि बेबीपण पवित्रतेचा आव आणून एकदम निघून गेली.

लिली : काय? कशाबद्दल?

संग्राम : (जोरात हाक मारतो) प्राध्यापक... बेबी...

लिली : त्यांना कशाला?

संग्राम : वर्मानाही बोलावलं असतं. . . पण वर्मा डेड.

लिली : ॲक्टर

संग्राम : (जोरात ओरडतो) मी तुला सांगितलं ना, वर्मा... डेड डेड... डेड

लिली : (भीतीने) बेबी...

संग्राम : (ओरडतो) प्रोफेसर...

लिली : का ओरडतो आहेस?

संग्राम : (आणखी जोराने) चौकीदार..

लिली : अरे देवा!

(बेबी आणि सुब्रत येतात.)

बेबी : लिली...

सुब्रत : ॲक्टर...

संग्राम : वर्मा डेड.

लिली } : ॲक्टर

बेबी } : ॲक्टर...

सुब्रत } : ॲक्टर

संग्राम : सांगितलं ना, डेड... डेड... डेड...

(तेवढ्यात वर्मा आत येतो. अतिशय थकलेला, हातात बंदूक, संग्राम सोडून सगळे

आश्चर्याने बघतात)

वर्मा : काय झालं?

संग्राम : (त्याच्याजवळ जात) वर्मा... डेड...

वर्मा : ॲक्टर

संग्राम : (सुब्रत, बेबी व लिलीकडे बघत) सगळे भ्याड. कोणाच्याही तोंडून शब्द फुटत नाही आहे. कोणीही सांगू शकत नाही.

वर्मा : पण काय?

संग्राम : वर्मा... डेड...

(वर्मा बंदूक खाली ठेवून बेल्ट सोडता सोडता)

वर्मा : मला तर काहीच समजत नाहीए.

संग्राम : नाहीच समजणार.

वर्मा : लिली?

संग्राम : मेकअप...

वर्मा : म्हणजे काय?

संग्राम : पिकनीक... जवळच झरा... मग खूऽऽप दूर...

वर्मा : सुब्रत?

सुब्रत : शिकार कुठे आहे?

वर्मा : हो, हो जरा वाट बघा.

संग्राम : (संमोहित स्वरात) वाट पहा. वाट पहा.

वर्मा : मीही रात्रभर वाट बघितली.

संग्राम : मग थकला असाल?

वर्मा : चहा मिळेल?

लिली : बेबी...

बेबी : हो.

सुब्रत : आम्ही कोणीच अजून चहा घेतला नाही.

संग्राम : असू दे.

वर्मा : म्हणजे काय?

संग्राम : वर्मा इज डेड... आणि गेलेला माणूस चहा पीत नाही.

बेबी : (हसत) वेडा आहे.

संग्राम : वेड्या माणसाचा सगळेच राग राग करतात.

बेबी : हो.

संग्राम : वेडा माणूस भला नसतो.

लिली : नसतोच.

संग्राम : (अतिशय दु:खाने खाली बसत) ओऽऽऽह

वर्मा : (संग्रामच्या जवळ जात) काय झालं?

(संग्राम चाकू हातात घेऊन खोलीत फेऱ्या मारायला सुरूवात करतो.)

संग्राम : पशू... शेळी एक पाळीव... हो पशू (एकदम जोरात ओरडतो.) पशू... पशू... पशू...

सुब्रत : ॲक्टर...

संग्राम : (सुब्रतकडे चाकू फेकत) उचल तो चाकू.

सुब्रत : चाकू?

संग्राम : मारतोस... तुझ्यात साहस... बलवान आहेस...

बेबी : संग्राम!

संग्राम : (चाकू परत उचलून) मग तू घे.

बेबी : मी?

संग्राम : आत्महत्त्या...

वर्मा : काय झालंय तुम्हाला?

संग्राम : (लिलीला) नाहीतर तू तरी घे... हत्त्या का आत्महत्त्या?

वर्मा : खरोखरच वेड लागलंय.

सुब्रत : वेड लागलंय... का नुसता अभिनय?

वर्मा : (संग्रामच्या जवळ जात) अभिनय का तुला खरंच खाण सापडली आहे सोन्याची?

संग्राम : सोन्याची खाण... हा निर्जन डाकबंगला... हाताचं बोट... पवित्र... अलिप्त... शेळी एक पाळीव पशू... हा... हा... हा...

वर्मा : (सुब्रतपाशी जाऊन) नक्की काय झालंय?

सुब्रत : (बेबीला) बेबी?

संग्राम : सगळंच अस्वाभाविक... हास्यास्पद... सुब्रत... लिली... वर्मा... बेबी... वाघाची शिकार... शेळी... झऱ्याचा काठ... द्वेष... संशय... पिकनीक... दांभिकता...

वर्मा : (सुब्रतला) त्याचं बोलणंही विसंगत.

सुब्रत : हो कशाचा कशाला मेळ नसलेलं.

संग्राम : (दोघांच्या जवळ जात) अभिनेत्याच्या गोष्टी... नुसताच अभिनय.

बेबी : ॲक्टर...

संग्राम : ॲक्टरला नाव तरी आहे कुठे? संग्राम नाव केव्हाच हरवलं.

(चाकू उघडतो.)

सुब्रत : ॲक्टर...

संग्राम : काल रात्री मी रंगीत तालीम केली.

वर्मा : रंगीत तालीम...

संग्राम : गप्पा मारायला कोणीच नव्हतं... तुम्ही म्हणत होतात ॲक्टींग करून दाखव... मोनोॲक्टींग... दाखवू?

वर्मा : (खूष होऊन) हो दाखवा ना?

संग्राम : हा कार्यक्रम काल रात्री केला असता तर छान झालं असतं.

वर्मा : काल रात्री?

संग्राम : खराखुरा अभिनय बघायला मिळाला असता.

लिली : ॲक्टर...

संग्राम : हो रंगमंचही तयार होता.

सुब्रत : रंगमंच?

संग्राम : हो बेबीने सजवला होता. डहाळ्या पानं... आज ती वाळून गेली आहेत.

वर्मा : हो वाळकी पानं बाहेर पडलेली आहेत.

संग्राम : असू दे... आत्ताच करून दाखवितो.

वर्मा : (खाली बसतो) पण आधी चहा...

संग्राम : पण मग खूप उशीर होईल. मी एवढा वेळ थांबू नाही शकणार.

वर्मा : ठीक आह. करा सुरूवात.

संग्राम : (इतरांकडे बघत) बसा सगळेजण. (काय करायचं ते न सुचून सगळेजण खाली बसतात.) हं तर रेडी... हा आपला रंगमंच... मी अभिनेता... आता

मी रंगमंचावर आलो... नाटकाची थोडी प्रस्तावना अशी... स्वतःची इच्छा पूर्ण करण्यासाठी इथे एकजण दुसऱ्याला ठार मारायला तयार आहे. तर आणखी एकजण स्वतःच्या सुखासाठी कोणाबरोबरतरी पळून जायला तयार आहे. पण शेवटी कोणाच्यातही स्वतःच्या इच्छा पूर्णत्वास नेण्याइतकं पुरेसं साहस नाही. काहीतरी सबब ते पुढे करतात... म्हणजे प्रत्येकजण दांभिक आहे... ढोंगी आहे... स्वतःलाच ते मारतात... स्वतःच्या इच्छा. . . स्वतःच मन मारतात. हा प्रसंग ॲक्टरने तुमच्यासाठी जर करून दाखविला....

(बेबी, लिली आणि सुब्रत माना खाली घालून बसले आहेत. एकदम सुब्रत वर बघून..)

सुब्रत : ॲक्टर...

संग्राम : अभिनय... ॲक्टरच्या हातात चाकू आहे... तो कमकुवत नाही आहे... तो मनाने शुद्ध व तितकाच पवित्र आहे. त्याच्या अभिनयातही तितकीच पवित्रता असली पाहिजे. विश्वास आणि कृती त्याच्यालेखी दोन्ही एकच आहेत... हा चाकू... ज्या चाकूने शेळीही कापतात... पण शेळी कापायच्या आधी शेळीचे पाय धरून ठेवतात... (पहिल्यांदा सुब्रत आणि मग इतरांजवळ जात) धरा... धरा माझे पाय... माझे हात, माझी मान... माझं डोकं... (सगळे गप्प असतात. एकटा वर्मा तेवढा हसत असतो.) नाही. तुमच्यापैकी कोणातही धैर्य नाही... सगळे ढोंगी... एकटा ॲक्टर ढोंगी नाही... तो पवित्र आहे... आता तो विंगमध्ये जाईल... तो चाकू पोटाला लावेल आणि मग... मग...

(संग्राम स्वतःच्या पोटाला चाकू लावतो आणि डाव्या खोलीत जातो.)

वर्मा : वा, फारच सुंदर अभिनय.

सुब्रत : खूऽऽपच छान.

बेबी : पण...

लिली : कॉलेजमध्येही तो अभिनय करायचा.

बेबी : नाही.

सुब्रत : पण तूच तर म्हणत होतीस... कॉलेजमध्ये...

बेबी : (अनिश्चापूर्वक) हो.

(चौकीदार आत येतो.)

चौकीदार : साहेब... मी साफ बुडालो... साहेब...

सुब्रत : का, काय झालं?

चौकीदार : माझी शेळी साहेब...

वर्मा : (उठतो) हो, मीच मारून टाकली... रात्रभर वाट बघून काहीच शिकार मिळाली नाही...

लिली : मग परत येताना...

वर्मा : हो, फिरताना दिसली, म्हणून मी मारून टाकली.

चौकीदार : (रडायला लागतो) साहेब...

लिली : त्यात एवढं रडायला काय झालं? पैसे घे.

सुब्रत : हो, किंमत सांग?

वर्मा : किती पैसे बोल?

लिली : मी छान कटलेट बनवीन.

(चौकीदार रडतच असतो संग्राम इतकावेळ खोलीत का राहिला म्हणून बेबी अस्वस्थ झाली आहे.)

बेबी : पण अजून ॲक्टर...

सुब्रत : ॲक्टर?

लिली : आपण आजच परत जाऊ या.

वर्मा : (जोरात हाक मारतो) अरे ॲक्टर... इकडे या. फारच सुंदर अभिनय केलात. आज रात्री कटलेट.

(संग्राम कष्टाने पावले टाकत आत येतो. अर्धा चाकू त्याच्या पोटात घुसलेला आहे. तो रक्ताने माखलेला आहे.)

संग्राम : कटलेट... पिकनीक... आपण सगळं विसरू या...

(तडफडत खाली कोसळतो.)

बेबी :

लिली : (त्याच्याजवळ जात) ॲक्टर...

सुब्रत :

(वर्माला नक्की काय झालंय हे समजत नाही आणि तो सगळ्यांना ढकलून संग्रामच्या जवळ जातो.)

वर्मा : अजून तेच... ॲक्टींग...

संग्राम : (चाकू तसाच पोटाशी धरून) दांभिकपणा... शेळी एक पाळीव प्राणी...

ओऽह नाही... काहीच चुकीचं नाही... ॲक्टर... ॲक्टर... अभिनय.... फक्त अभिनय...

(सुब्रत आणि लिली भीतीने संग्रामकडे वाकून बघतात)

सुब्रत : ॲक्टींग...?

लिली : ॲक्टींग...?

(बेबी सगळ्यांना बाजूला सारते. जखमी संग्रामचं डोकं आपल्या मांडीवर घेते. रडत रडत भरल्या आवाजात म्हणते..)

बेबी : नाही... नाही... नाही...

(सगळेजण एकदम गप्प होतात. बेबीची मान खाली झुकते जशी काही तिची बोलण्याची शक्ती निघून गेली आहे. वर्मा काही न समजून नुसताच भकासपणे उभा आहे. सुब्रत व लिली हळूहळू पाठीमागे सरकतात. चौकीदार सगळ्यात मागे उभा राहून रडत असतो.)

(पडदा पडतो)